
इतिहासाचार्य वि. का. राजवाडे
संशोधन मंडळाचे त्रैमासिक

संपादक

श्री. श्री. भा. भट
श्री. द. रा भट
डॉ. प्र. न. देशपांडे
डॉ. मु. ब. शहा

संशोधक

डिसेंबर १९८३



२० कलमी कार्यक्रमाव्दारे उपेक्षितांच्या जीवनात नवा प्रकाश

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई ४०० ०३२

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाने
अनुदान देऊन पुरस्कृत केलेले
त्रैमासिक

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे
संशोधन मंडळाचे त्रैमासिक

संपादक

श्री. श्री. भा. भट
श्री. द. रा. भट
डॉ. प्र. न. देशपांडे
डॉ. मु. ब. शहा

संशोधक

डिसेंबर १९८३

वर्ष ५१ वे   अंक ४ था

वार्षिक वर्गणी : पंधरा रुपये   अंकाचे मूल्य : पाच रुपये

अनुक्रम

प्रकाशक

श्री. भा. भट, संपादक

वि. का. राजवाडे संशोधक मंडळ, धुळे

मुद्रक

चिं. स. लाटकर

४६१/४ सदाशिव पेठ

टिळक रस्ता, पुणे ४११०३००

मुखपृष्ठ

ईश्वर दिवे

आईज ॲडव्हर्टायजिंग, पुणे

सनातन संप्रदाय आणि इंग्लंडमधील समकालीन स्थिती

व्यं. सु. पाटणकर

'सनातनपंथ आणि ब्रिटिशांची महसूलपद्धती' या 'संशोधका' च्या जुलै-सप्टेंबर १९८३ च्या अंकातील प्रा. कुळकर्णी यांच्या लेखात व्यक्त झालेल्या विचारांचा परामर्श घेण्याचा प्रस्तुत लेखकाचा उद्देश नाही. हिंदुस्थानात ब्रिटिशांनी अवलंबिलेल्या महसूलयंत्रणा आणि पद्धती यावर इंग्लंडमधील समकालीन अर्थव्यवहारविषयक अनुभव आणि आर्थिक तत्त्वज्ञान यांचा संभाव्य प्रभाव हा वादाचा आणि विश्लेषणाचा महत्त्वाचा विषय ठरू शकतो यासंबंधी दुमत असण्याचे कारण नाही. परंतु मुळातच इंग्लंडमधील अठराव्या शतकाचा उत्तरार्ध आणि एकोणिसाव्या शतकाचा प्रथमार्ध यांमधील आर्थिक विचारांचे नेमके स्वरूप कोणते होते आणि त्यांचा तत्कालीन परिस्थितीशी संबंध कोणता होता हे उलगडून दाखविण्याइतपत प्रस्तुत लेखाचे प्रयोजन आहे.

सनातनसंप्रदाय किंवा आर्थिक उदारमतवाद हा अर्थशास्त्रीय विचारांच्या इतिहासातील एक महत्त्वाचा टप्पा मानला गेलेला आहे. स्मिथ हा या विचारसरणीचा इंग्लंडमधील जनक. नव्या औद्योगिक युगाच्या आरंभकाळाच्या संदर्भात आपल्या आर्थिक तत्त्वज्ञानाची आणि विचारांची मांडणी तो करीत होता. व्यक्तिस्वातंत्र्य, स्पर्धेची उपकारकता, शासनाचे निर्हस्तक्षेपाचे धोरण आणि खुला व्यापार या चतुःसूत्रीवर त्याचे तत्त्वज्ञान आधारलेले होते. समाज हे एक विशाल कुटुंब त्याने मानलेले होते आणि व्यक्तिहित आणि समाजहित यांमधील सुसंवाद हे त्याच्या तत्त्वज्ञानाचे ठळक अंग होते. निसर्गाची शक्ती मानवी कल्याणासाठी अधिकाधिक कशी वापरता येईल या दृष्टिकोणातून आपल्या साऱ्या आर्थिक विचारांचे तो समर्थन करीत होता.

रिकार्डो आणि माल्थस हे दोघेही समकालीन विचारवंत, परंतु त्यांचा लेखनकाल हा स्मिथनंतर जवळपास अर्धशतकानंतरचा आहे. उदारमतवादी तत्त्वज्ञानावर आधारलेल्या औद्योगिक भांडवलशाहीच्या समस्यांचे दर्शन या काळात अधिक स्पष्टपणाने घडत होते. तौलनिक किंमतींमध्ये समतोल, एकूण उत्पादनसाधनांची

विविध उपयोगांत सुयोग्य विभागणी आणि उत्पादनातील कमाल कार्यक्षमता हे साध्य करण्यासाठी स्वातंत्र्य आणि खुल्या स्पर्धेची स्मिथने पुरस्कारलेल्या तात्त्विक चौकटी-वर रिकार्डोची श्रद्धा अढळ होती. माल्थसचे मात्र एक पाऊल सनातन संप्रदायाच्या तंबूबाहेर होते असा इतिहासकारांचा निर्वाळा आहे. भांडवलसंचयासंबंधीचे त्याचे भाष्य अर्थशास्त्राच्या अभ्यासकांना सुपरिचित आहे.

समाजातील विविध वर्गांच्या हितसंबंधांमध्ये समन्वय साधण्याचे कार्य निसर्गाची अदृश्य शक्ती करीत असते अशी स्मिथची धारणा आहे. राष्ट्राच्या संपत्तीचे स्वरूप आणि ही संपत्ती वृद्धिंगत करण्याच्या कारणांचा शोध घेणे हा त्याचा उद्देश आहे. स्पर्धाधिष्ठित भांडवलशाहीचा पुरस्कार या भूमिकेतून तो करतो. रिकार्डोने मात्र विभाजनक्षेत्रातील वर्गीय हितसंबंधांवर आपले लक्ष केंद्रित केलेले आहे. वर्धमान राष्ट्रीय उत्पन्न विविध वर्गांमध्ये कसे वाटले जावे (आणि कसे वाटले जाते) आणि त्यामागील सूत्रे वा नियम कोणते हा अर्थशास्त्राच्या अभ्यासाच्या केंद्रस्थानी असलेला विषय आहे असे रिकार्डोचे आग्रही प्रतिपादन आहे. आर्थिक वृद्धीचा उत्पादनघटकांच्या उत्पन्नावरील परिणामांची चिकित्सा याचाही विचार या विषयाला अंगभूत आहे. रिकार्डो आणि त्याचप्रमाणे माल्थस यांचा भांडवलशाहीच्या भवितव्यासंबंधीचा सूर निराशावादी आहे आणि तिच्या चिरंतन आदर्शासंबंधी साशंकता व्यक्त करणारा आहे. १७५० नंतरच्या सुमारे पाऊणशे वर्षांतील इंग्लंडमधील आर्थिक-सामाजिक वाटचालीची साहजिकच या विचारांना पार्श्वभूमी लाभलेली आहे.

उद्योगीकरणाचे ब्रिटिश समाजरचनेवर जे परिणाम झाले त्यांची प्रथम नोंद घ्यावयास हवी. जमीनमालक वर्गाच्या हातातील राजकीय सत्तेच्या पारंपरिक एका-धिकारावर हल्ले होऊ लागले आणि व्यापारी आणि मध्यमवर्गीयांचे वर्चस्व वाढायला कारखानदारीचा विकास कारणीभूत ठरला. अठराव्या शतकाच्या अखेरीस इंग्लंडमध्ये कूळपद्धती प्रचलित होती. वाढत्या कारखानदारीबरोबरच धान्य पिके आणि औद्योगिक कच्च्या मालाला मागणी वाढणे अपरिहार्य होते. देशांतर्गत बाजारातील शेतीमालाच्या किंमती त्यामुळे वाढू लागल्या. या परिस्थितीचा फायदा उठविण्याच्या दृष्टीने काही व्यापारी बाहेरच्या देशांतून स्वस्त धान्याची आयात इंग्लंडमध्ये करू लागले. परिणामी ब्रिटिश जमीनमालकवर्गाचे यामुळे नुकसान होऊ लागले. जमीनमालकवर्ग आपल्या हितसंबंधांचे रक्षण करण्यासाठी धान्यआयाती निर्बंधित करण्याची मागणी करू लागला व यामधून ' कॉर्न लॉ ' चा जन्म झाला. धान्यआयातीवर जकाती लादण्याच्या या कायद्यातील तरतुदीमुळे जमीनमालकवर्गाला संरक्षण मिळत होते. व्यापारी आणि कारखानदारवर्ग मात्र अशा संरक्षण तटबंदीविरुद्ध म्हणजे ' कॉर्न लॉ ' रद्द करण्याच्या पक्षाचा होता. त्यांच्या दृष्टीने धान्याच्या किंमती कमी राहणे हेच हितकारक होते.

रिकार्डोच्या अर्थशास्त्रीय विचारांचा नेमका हाच आधार होता. त्याच्या मते (किंबहुना सनातनसंप्रदायाच्या मते) वेतन हे निर्वाहपातळीशी जखडलेले होते. धान्य महागले तर वेतनाच्या वाढीची मागणी होणार आणि ती नाकारता येणार नाही. वेतनवाढ म्हणजेच उत्पादनखर्चात वाढ आणि नफ्याच्या पातळीवर घट असे हे समीकरण होते. वेतन आणि नफा हे नेहमी परस्परविरोधी दिशेने जातात अशीच रिकार्डोची भूमिका होती. धान्याच्या किंमती कमी राहिल्या तर त्याचा आणखी फायदा असा की, उत्पादनखर्च कमी होईल आणि त्यामुळे ब्रिटिश मालाची परकीय बाजारपेठांमधील स्पर्धाशक्ती वाढेल आणि निर्यातवृद्धीला चालना मिळेल.

अठराव्या शतकाच्या उत्तरार्धामध्ये इंग्लंडमध्ये शेतीव्यवसायात घडून आलेले बदल लक्षात घेणे अगत्याचे आहे. एन्क्लोजर मुव्हमेंटचा परिणाम म्हणून निर्वाह शेतीचे हळूहळू भांडवलशाही शेतीमध्ये रूपांतर होऊ लागले. जमीन कसणुकीसाठी कूळपद्धती जरी प्रचलित असली तरी जमीनमालकांचा वर्ग जमिनीच्या मालकी हक्कावरील आपली पकड घट्ट कशी करता येईल आणि आपले सामाजिक सामर्थ्य आणि प्रतिष्ठा उंचावता येईल या दिशेने प्रयत्नशील राहिला. केवळ वेतनावर जगणाऱ्या भूमिहीन शेतमजुरांच्या वर्गाच्या उदयाची कारणे याच घटनांमध्ये दडलेली आढळतील. अशा शेतमजुरांची संख्या यथाकाल वाढू लागली. भांडवलशाही शेतीउत्पादक आपला माल बाजाराकडे पाठवू लागल्याने शेतमजुरांना वाढत्या निर्वाहखर्चाला तोंड देणे भाग पडले; परंतु आपले वेतनमान मात्र वाढवून घेणे अडचणीचे दिसू लागले.

१७७० ते १७९० या काळात इंग्लंडमध्ये धान्याच्या किंमतींची प्रवृत्ती वाढीकडे होती. शेजारच्या फ्रान्समधील यादवी आणि त्यापाठोपाठ नेपोलियनचे आक्रमण यामुळे इंग्लंडमधील धान्याची आयात थंडावलेली होती. ही परिस्थिती १८१३ पर्यंत टिकून राहिली. देशांतर्गत धान्याच्या किंमती वाढल्याने मजूरवर्गात असंतोष निर्माण झाला आणि कारखानदार व व्यापारीवर्गाला ते जाचक ठरू लागले. जमीनदारवर्ग मात्र या परिस्थितीचा फायदा उठवीत होता. १८१३ मध्ये युद्ध थांबताच स्वस्तधान्य आयातीचा मार्ग खुला झाला आणि इंग्लंडमध्ये धान्यभाव कोसळू लागले. ब्रिटिश पार्लमेंटमध्ये जमीनमालकवर्गाचे प्राबल्य त्या काळात असल्याने आयातीवर कडक नियंत्रणे लादणारा 'कॉर्न लॉ' १८१५ मध्ये अस्तित्वात आला. व्यापारी आणि कारखानदार वर्गाच्या दृष्टीने ही घटना अनिष्ट होती आणि हा कायदा रद्दबातल ठरविण्यासाठी मोठी चळवळ उभी राहिली आणि अखेरीस १८४६ मध्ये त्या कायद्याचे उच्चाटनही झाले. 'कॉर्न लॉ' रद्द होऊन स्वस्त धान्य मुबलक प्रमाणात ब्रिटिश बाजारपेठेमध्ये उपलब्ध होणे कसे जरुरीचे आहे या भूमिकेचे समर्थन करण्यासाठी रिकार्डोने आपला खंडसिद्धान्त मांडला. कॉर्न लॉ अस्तित्वात असलेल्या काळात शेती सुधारणेत काही विशेष प्रगती घडून आली नाही आणि शेतीमालाच्या किंमतीमध्ये

चढउतार होत राहिले हे लक्षात घेण्यासारखे आहे.

१८१५ च्या फेब्रुवारीमध्ये रिकार्डोबरोबरच माल्थस, एडवर्ड वेस्ट आणि रॉबर्ट टॉरेन्स यांनीही आपली खंडासंबंधीची मीमांसा मांडली. स्मिथनेही खंडासंबंधी काही विचार पूर्वी व्यक्त केलेले होते, पण त्यात विसंगतीचा मोठाच दोष होता. खंड हा उत्पादनखर्चाचा भाग आहे आणि नाही या दोन्ही भूमिका त्याने मांडलेल्या आढळतात. रिकार्डोच्या मते खंड हा विभेदजन्य लाभ आहे तसाच तो खर्चावरील वाढावाही आहे. जमीन या निसर्गदत्त घटकाचा पुरवठा सीमित असून त्याची पुरवठा-किंमत शून्य आहे या घटनेकडे लक्ष वेधून रिकार्डो असे प्रतिपादन करतो की, धान्याच्या (गव्हाच्या) किंमतीतील प्रत्येक वाढ खंडामध्ये वाढ घडवून आणीत असते, मग ही किंमतवाढ धान्यावरील आयातकरामुळे असो किंवा लोकसंख्यावाढीमुळे असो, उलटपक्षी याच न्यायाने धान्याच्या किंमतीतील घट खंडामध्ये घट घडवून आणीत असते. तात्पर्य, खंडवाढ हे किंमतवाढीचे कारण नसून तो परिणाम आहे.

भांडवलशाहीच्या विकासाबरोबर खंडवाढ अपरिहार्यपणाने होत राहिल्याने जमीनमालक आणि समाजातील इतर वर्ग यांमध्ये नेहमीच संघर्षाचे वातावरण राहील असे रिकार्डोचे अनुमान आहे. खंडाविषयी माल्थसची तात्त्विक भूमिका यापेक्षा वेगळी नाही, परंतु माल्थस खंडरूपी वाढाव्याचे समर्थन करतो. खंडावर जगणारा जमीनदारवर्ग हा अनुत्पादक उपभोक्त्यांपैकी असल्याने भांडवलशाहीच्या स्थैर्याला हातभार लावणारा असा हा वर्ग आहे असे माल्थसचे प्रतिपादन आहे. हे स्थैर्य आपोआप साधले जात असते ही स्मिथची भूमिका माल्थसला अमान्य होती. तात्पर्य, असे की सनातनवाद्यांचे आर्थिक तत्त्वज्ञानासंबंधी सर्वसाधारण एकमत असले तरी आर्थिक घडामोडींच्या अन्वयार्थासंबंधी त्यांच्या विचारातील वेगळेपणा उघडपणे जाणवत होता.

श्रीरामभक्त आदिवासी संत सारस्वत :
खानदेशाचे श्रीशंकर महाराज

प्रा. डॉ. विश्वास पाटील

खानदेश अनेक साधु-संतांचा देश. तापीसारख्या पवित्र नदीचा व सातपुड्या-सारख्या उत्तुंग पर्वताचा देश. इथे कला, साहित्य, संगीत, शिल्प, नेतृत्व या क्षेत्रांत पुढारीपण मिरवणारी अनेक माणसं होऊन गेलीत. संत सत्पुरुषांच्या मालिकेतही खानदेशात जन्माला आलेल्या व कर्तृत्व सिद्ध करणाऱ्या महापुरुषांची यादी मोठी ठरावी ! आदिवासी समाजात जन्म घेऊन आपल्या समाजाला आत्मबोध करवून देणारे, व्यसनमुक्तीचा रोकडा धर्म शिकवणारे, बचती वाढविण्याचे घरगुती अर्थशास्त्र सांगणारे आणि अखिल मानवजातीवर उदंड प्रेम करायला शिकवणारे संत होऊन गेलेत. लौकिक अर्थाने संतांचे शिक्षण बघावयाचे नसते तरी ते सबंध समाजाचे अनु-भवगम्य लोकशिक्षण करीत असतात.

जळगाव जिल्ह्यातल्या शिरसगाव गावी दिनांक १८ मार्च १९१५ रोजी शंकर महाराजांचा जन्म झाला. ह्या गावात आदिवासी समाजाचे त्यांचे एकुलते एक घर होते. त्यांच्या वडिलांना नऊ एकर जमिनीचा तुकडा इनाम म्हणून लाभला होता. लहानपणीच माता–पित्याचे छत्र हरपले. शंकर महाराज पोरके झाले. एकाकी झाले. देवळी येथे मामांकडे ते वाढले. गावाची चाकरी करावी अन् मागून भाकरी खावी असा दिनक्रम सुरू झाला. हा उपक्रम वयाच्या तेराव्या वर्षापर्यंत सुरू राहिला.

वयाच्या चौदाव्या वर्षी ते विरक्त झाले. शिरसगाव येथील रहिवाशी श्री. दादाभाऊ पाटील यांच्या मळ्यात औदुंबराच्या झाडाखाली त्यांनी निवास केला. पुनश्च गावात न परतण्याचा निश्चय करून तिथेच एक छोटीशी कुटी बांधली. औदुंबराखाली तपश्चर्येस आरंभ झाला. कुणाला काही देणं नाही व कुणाजवळ काहीही मागावयाचे नाही हा आरंभापासूनचाच शिरस्ता ! वेळेवर कुणी जे काही आणून दिले ते आनंदाने ' अन्नब्रह्म ' मानून सेवन करावयाचे असा थाट. श्री. दादाभाऊ पाटील यांचे धाकटे बंधू श्री. तुकाराम पाटील त्यांना भोजन आणून देत असत. महाराज अपरिग्रही वृत्तीने राहात. भल्या पहाटे उठावे, थंडगार पाण्याने स्नान करावे, संत तुकोबाराय–नामदेवरायांचे अभंग मोठ्या आवाजात म्हणावे अशी दैनंदिन कार्य-

पद्धती होती. त्यांचा आवाज सुरेल होता. ते उत्तम चित्रे काढत. बासरी तर ते विलक्षण एकात्मतेने वाजवीत असत. त्या स्वरांनी उभे रान वेडावून जाई. सर्वत्र नामघोषाचा अमृतध्वनी विहरत राही. रानात ते निर्भयपणे एकटेच राहात. शके १८५८ रथसप्तमीच्या शुभदिवशी (काही ठिकाणी हा शक १८५७ आहे.) त्यांना आत्म-साक्षात्कार घडला. त्यांनी आपले आत्मचरित्र 'अभिनव आत्मचरित्र' किंवा 'नवीन चरित्र' शीर्षकाने लिहिले आहे ते मुळातूनच वाचण्यासारखे आहे. या आत्म-चरित्राबद्दल ते म्हणतात—

"शके १८५८ माघ शुद्ध ७ रोज मंगळवार, ता. १९ रथसप्तमीच्या दिवशी हा चमत्कार घडून आला आहे. या लेखाप्रमाणे (हा लेख अदमासे ४० पृष्ठांचा हस्त-लिखित भरावा) असे हजार लेख लिहून तयार होतील तरी ही कथा माझ्याने सांगितली जाणार नाही, पण भगवंतांनी मला सांगितले होते की तुला जर आपला परस्परांचा संवाद लिहून ठेवण्याची इच्छा असेल तर किंचित लिहून ठेव ! त्यामुळेच मी हे चरित्र किंचित सारासार लिहून ठेविले आहे ! !"

आत्मसाक्षात्काराच्या प्रसंगाचे वर्णन करताना महाराजांच्या लेखणीचे तरल–आर्द्र होणे केवळ स्वाभाविक आहे. ते म्हणतात—

"शके १८५७ साली माघ महिन्यात कृष्ण पक्षातील विजया स्मार्त एकादशी रोज मंगळवार—ते दिवशी ईश्वरभक्त शंकर हा रात्री ईश्वराचे ध्यान करीत बसला होता. अर्धी रात्र झाली, त्या समयी एकाएकी दत्तदत्त शब्द बोलून एक विचित्र मूर्ती झोपडीपुढे येऊन उभी राहिली. त्या मूर्तीचा आकार असा होता की सहा हात, दोन शिरे आणि एका हातात गाईसारखा आकार दिसत होता. असा चमत्कार पाहिल्याबरोबर शंकराने त्या मूर्तीच्या पायांवर मस्तक ठेविले. दोन्ही हातांनी घट्ट पाय धरिले. इतक्यात मूर्तीच्या पायातून सुगंध सुटला तो शंकराच्या मस्तकात भरला. सुगंधामुळे देहभानाचे विस्मरण झाले. शरीराला थरकाप सुटला. भाषाही सुचेना ! मग ती मूर्ती म्हणाली की 'हे मानवा, मी दत्तात्रेय आहे. तुला काय पाहिजे ते माग. मी प्रसन्न आहे.' पण शंकर बोलेना. पुन्हा दत्त वरीलप्रमाणे बोलले. तेव्हा शंकराच्या मुखातून असा शब्द निघाला की 'अहो दत्त गुरु, महाराजा ! मला फक्त माझी माहिती करून द्या. दुसरे काही लागत नाही.' असे म्हणून गुपचूप राहिलो."

स्वयंस्फूर्तीने त्यांनी अभंग रचना करायला प्रारंभ केला. शिरसगाव ग्रामी त्यांनी १०५६ अभंग लिहून काढलेत. अक्षर अतिशय सुवाच्य, रेखीव, मोत्यांच्या ओळीं-प्रमाणे. ते बोरूने लिहीत. कुठलंही वाचन ते करीत नसत. कुठलीही टाचणं त्यांच्या-पाशी नव्हती. अखंड रामनाम सुरू. शिक्षण फक्त पहिल्या इयत्तेपर्यंत झाले होते. आठ वर्षांनंतर त्यांनी हे ध्यान सोडले. काशीयात्रेचा संकल्प मनात योजून ते निघाले होते. लोकांच्या प्रेमयुक्त आग्रहामुळे पुन्हा एक वर्ष त्यांनी पाटलांच्या मळ्यात काढले,

पण मन मात्र त्यांचं काशीयात्रेसाठी बेचैन होतं. पायीच काशीयात्रा करायचा विचार पक्का ठरविला. चाळीसगाव स्टेशनवर येऊन दाखल झाले तेव्हा त्यांना असे वाटले की, रंजनपूर ता. तळोदा येथील आदिवासी सत्पुरुष श्री. गुलाबमहाराज यांच्या पवित्र भूमीचे व पुण्यवान समाधीचे दर्शन घ्यावे. या इच्छेने प्रेरित होऊन त्यांनी काशीयात्रेऐवजी दोंडाइच्याकडे प्रस्थान आरंभिले. यात्रेतच ते शहादे तालुक्यातील मनरद गावात आले. ते १९४१ साल होते. शेकडो लोक त्यांच्या दर्शनासाठी आले. ते फारसे कुणाजवळ बोलत नसत, कुणाजवळ काही मागत नसत. पै–पैसा कुणालाही आपल्या पुढ्यात ठेवू देत नसत. निरंतर रामरायाच्या ध्यानात समाधिमग्न अवस्थेत असत. गावकऱ्यांच्या आग्रहास्तव ते गावाजवळील आमराईत झोपडी बांधून राहिले. आपल्या जन्म व चरित्राबद्दल महाराज असे म्हणत—

"रामावतारात सीतेचा शोध करीत असताना प्रभू रामचंद्रांना वाटेत शबरी भिल्लिणीचा आश्रम लागला. शबरीने आश्रमात बोलाविले, तिने बोरे खाण्यास दिली. जाताना तिला विचारले, 'तुला काय पाहिजे ते मागून घे!' तिने काहीच मागितले नाही, करिता तिच्या कुळात जन्म घेऊन रामभक्ती करून तिचे ऋण फेडले. त्याकरताच मला या काळात तिच्या कुळात जन्म घ्यावा लागला."

१९४१ सालीच महाराज काशीयात्रेसाठी निघाले तो ६० लोक त्यांच्यासोबत होते. मनरद येथील श्री. रामजी लिमजी पाटील यांनी महाराजांना काशीस नेले. महाराजांचा अभंग लिहिण्याचा क्रम अखंड सुरूच राहिला. या भूमीवर ३८०० अभंग पूर्ण झाले. सारे लेखन म्हणजे प्रभू रामरायाची वाङ्मयीन आरती. जे बोलेन ते रामनाम, ऐकेन ते रामनाम, लिहीन ते रामनाम–अशी जणू त्यांची प्रतिज्ञाच होती. रामाव्यतिरिक्त माझे या जगात दुसरे कोणतेच कार्य नाही. माझा जन्मच मुळी रामनामाकरता आहे असे ते म्हणत व तसेच वागत.

* नामबीजे अवघे झाले। तेचि आम्हा सापडले।
दत्तरूपे लाभ झाला। त्याने नाममंत्र दिला।
तेचि करीन मी काम। उच्चारीन राम राम।
शंकर म्हणे यावाचून। कोठे रमेना हे मन ॥ १०३० ॥

अखंड मानवतावादी चिंतन करणाऱ्या या थोर सत्पुरुषाने एका जात पात-विरहित मानवधर्माचे अखंड–अभंग स्वप्न उराशी जोपासले. 'जाती भेद सोडा अहंभाव तोडा। पुण्यकृत जोडा हरिनामे।' हा त्यांचा घोष त्यांच्या गद्य आत्म-चरित्रातून व कवितेतून अनेकदा वाचता येतो. ते म्हणतात—

* आत्ममय जग भक्तीचा स्वधर्म। याती कुळ धर्म पाहू नये।
याती कुळ धर्म मिथ्याचि सकळ। आत्मा हा अढळ अविनाशी।

पशुपक्षादिक आत्माराम। भेदाभेद भ्रम अमंगळ।
भेदभाव ज्याचा गेला अहंकार। त्यासी अधिकार येथे आहे।
शंकर म्हणे त्या साधियेला देव। नाही दुजाभाव मनी त्याच्या ॥ ३१६॥

ते साक्षात ब्रह्म जाणणाऱ्या, सदाचरणी, शुद्ध आचरणी, सत्यवचनी, एकपत्नीव्रती माणसालाच ब्राह्मण म्हणून संबोधतात. त्यांचे वैष्णवी चिंतन अशा पद्धतीने नव्या मानवधर्माचे उद्गाते ठरते. महाराज लिहितात—

ज्याचे शुद्ध आचरण। त्यासी म्हणावे ब्राह्मण।
जैसे गंगेचे जीवन। तैसे राहे त्याचे मन।
सदा मुखी सत्य वाचा। एक पत्नि नेत्र साचा।
शंकर म्हणे जगती। तेचि भगवंत मूर्ती। ॥ ७४॥

आपल्या आत्मचरित्रात महाराजांनी अतिशय स्वच्छ शब्दात आपले या संदर्भातील चिंतन मांडून ठेवले आहे—

"या कलियुगात मी भिल्लाच्या पोटी जन्म घेतला, म्हणूनच यांच्या मनात भेदभाव उत्पन्न झाला आहे, पण मी जर यांच्या घराण्यात जन्म घेतला असता आणि मग जर मी भक्तीचे सोंग घेऊन येथे बसलो असतो तर यांच्या मनात तिळमात्रही भेदभाव राहिला नसता आणि मग यांचे सर्व चित्त माझ्याकडे लागून राहिले असते व एका दिवसात सतरा वेळा माझा समाचार घेतला असता."

शंकरमहाराजांचे 'नवीन चरित्र' शीर्षकाचे आत्मचरित्र काही केवळ चमत्कारिक कथा-प्रसंगांनी भरलेले चरित्र नाहीय! त्यात ज्ञान–विज्ञानाच्या, भाषोत्पत्तीच्या, सृष्टिरहस्याच्या, साधुलक्षणाच्या, देवदेवतादिकांच्या पृथ्वीतलावर विचरण्याच्या अनेक उपयुक्त, तर्कसंगत अन् प्रत्ययकारी कथा आहेत. यात चौदा भुवनांची नावे आहेत. चौसष्ट कलांची सुसूत्र यादी आहे. एक अतिशय मनोरम संवादात्मक पद्य आहे. यातच कलियुगाचे केलेले वर्णन अतिशय उचित व बुद्धीला पटेल असेच आहे. कलियुगातील वातावरण व तत्कालीन परिस्थितीचा अचूक वेध महाराजांच्या दिव्य प्रज्ञेने घेतलेला आहे. कलियुगाचे वर्णन करताना महाराज लिहितात—

"स्त्रिया पती सोडून परपुरुषांशी रत होईल. (होतील) मनुष्य आपली धर्मपत्नी सोडून परदारा गमन करतील. तरुण विधवा स्त्रिया परपुरुषी रत होऊन ज्यापासून जो गर्भ उत्पन्न होईल त्याचा त्याग करून माझ्यावर (भूमीवर) फेकून देतील. बहिण भावाशी रत होईल, बाप मुलीशी रत होईल, देवा, इतकेच नव्हे तर आई पुत्राशी द्वेष करील मग इतरांची काय कथा?"

"कलियुग लागताच केवळ शंभर निमिष आयुष्य राहील. शंभर निमिष म्हणजे मृत्युलोकीची शंभर वर्षे होतील. आता हिरव्या पक्षाचे पोटी मोत्ये उत्पन्न होतात, पण कलि लागताच मोत्ये नष्ट होऊन समुद्रात उत्पन्न होतील!"

श्रीशंकरमहाराज ध्यानमग्न अवस्थेत स्थितप्रज्ञ योग्यासारखेच वाटत असत. वाढलेला शुभ्र सोनेरी जटाभार, गौर–तांबूस वर्ण, मुखावर तपश्चर्येचे तेज आणि शांत, प्रासादिक, प्रसन्न अशी आल्हाददायक मुखमुद्रा असा त्यांचा थाट असे ! शुभ्र धोतर, स्वच्छ झब्बा व खांद्यावर उपरणे असा वेश असायचा. आपल्या दर्शनार्थ आलेल्या लोकांनाच ते उलट नमस्कार करीत. आपल्या आश्रमात रामपंचायतनाचा एक फोटो त्यांनी ठेवला होता. त्या फोटोलाच सर्वांना प्रणाम करायला लावीत असत. भेदाभेद कुठल्याही प्रकारचा मानीत नसत. त्यांचे संपूर्ण लेखन व चिंतन मानवताधर्मास वाहिलेले असेच होते. त्यांचा आज उपलब्ध असलेला एकमेव फोटो पाहिल्यावर तो तिशीतल्या युवकाचा मुळीच वाटत नाही. आजानुबाहू, दृढ संकल्पशील भालप्रदेश, अर्धोन्मीलित दृष्टी व कपाळी चंदनाचा टिळा, लांबसडक गौरवर्णीय बोटे, देहयष्टी युवकाची, रसरशीतपण चेहरा मात्र पक्व वृद्धासारखा— अशी चमत्कारिक देहरचना त्यांची होती. आपणास कोणी ओळखू नये, आपणावर परस्त्रीची कामवासना होऊ नये आणि आपण निष्कलंकपणे निजधामास जावे या हेतूने योगीपुरुष सर्वप्रथम बालपण लोकांना दाखवतात. परंतु तारुण्य लागताच एकदम वार्धक्य आपल्या अंगावर ओढून घेतात. महाराजांचे वार्धक्य अक्षरशः ओढून घेतलेले होते. त्यांची अप्रतिहत प्रज्ञा–काव्यातील विदग्ध रसवृत्ती तर उकलून दाखवीत होतीच; पण दैनंदिन व्यापाच्या अनेक गोष्टींवर ती समर्थपणे मौलिक भविष्यदर्शन प्रस्तुत करीत राहात असायची. त्यांची शक्ती अनेक अर्थाने 'शापादपि शरादपि' अशीच होती.

आत्मचरित्रात आलेल्या एका मनोरम कवितेच्या काही ओळी उद्धृत करून महाराजांच्या महापरिनिर्वाणाची चर्चा करू या ! यात नारदाने शंकराशी केलेला संवाद पुढील काव्यपंक्तीत आलाय. आठ कडव्यांत व्यक्त झालेल्या संवादाच्या प्रारंभिक ओळी अशा—

* तेव्हा नारद म्हणे जी शंकरा,
तरुण असताहि दिसतोसि म्हातारा हे न कळे ।
मज द्विकंठेश्वरा ! मग इथे नरा काही न कळे ।। १ ।।
कोण जाणे कैसी गति । ही न कळे मजप्रती
काय वर्णू मायापती । सांग आता ।। २ ।।

दर्शनार्थीसाठी मनरद येथे श्रीराममंदिर व्हावे अशी इच्छा त्यांनी प्रकट केली होती. श्रीरामपंचायतनाच्या चित्राची स्थापना त्यांनी करून ठेवली आहे. वयाच्या अवघ्या तिसाव्या वर्षी ता. २१ जुलै १९४५ आषाढ शुद्ध एकादशीस ब्राह्ममुहूर्तावर महाराज ब्रह्मलीन झाले. मनरद येथे त्यांची समाधी आहे. समाधीकरिता आठ खणी

बांधीव घर श्री. रामजी लिमजी पाटील यांनी दिले आहे. महाराजांच्या महानिर्वाणासंबंधी अंतःसाक्ष्य पुढील पदात आढळते—

* असो नसो भाव राहो तव पायी। एकावीण नाही चाड देवा।
अमर होऊनी पुन्हा इही आलो। गुण गाया झालो दास तुझा।
झाले आत्मज्ञान साधने संपली। इमारत झाली पूर्ण आता।
शंकर म्हणे देही असोनी व्यापक। एक ते अनेक मीचि झालो।। ११८७ ॥

आत्मचरित्रात महाराजांनी आपल्या देहत्यागानंतर करावयाची संपूर्ण व्यवस्था अत्यंत स्पष्ट शब्दात मांडलेली आहे. तो भाग पुढीलप्रमाणे—

"ते शरीर ज्या ठायी पडून राहील, मग ते घर असो अगर झोपडी असो अथवा कसलीही जागा असो. त्याच ठायी बरोबर चौकोनी खड्डा खोदून त्यामध्ये सर्व कापूर भरून नंतर ते शरीर त्यात ठेवावे. ते शरीर ठेवताना त्याच्या मस्तकी गुलाल वगैरे काहीच लावू नये. फक्त गोपीचंदनाचा गंध लावून त्यावर बुक्क्याची कोर रेखावी. मग तो देह खड्डयात बसवून सुगंधी मसाल्याने देह दाबून लगेच वरून पक्के करून घेतले पाहिजे अशी त्या देहाला मूठमाती द्यावी."

या उल्लेखानंतर महाराजांनी आपले आत्मचरित्र संपविले आहे. मनरदच्या गावकऱ्यांनी महाराजांचे शरीर गावातल्या शिवमंदिरानजिक पुरले होते पण आत्मचरित्रातील वरील उल्लेख वाचून देहाला पुनरपि महाराजांच्या सूचनांप्रमाणे व्यवस्थित पुरले.

हरिपाठ अभंग

महाराजांच्या आत्मचरित्रातून त्यांच्या जीवनविषयक घटनांचा मागोवा घेतल्यानंतर त्यांच्या काव्याचा विचार करू या. हरिपाठ अभंगात एकूण २९ अभंग आहेत. अभंगाचा विषय हरिस्मरण हाच असून निवान्त प्रसादगुणांनी युक्त अशी ही अभंगावली आहे.

तत्त्वज्ञान व भक्ती

महाराजांनी या अभंगातून गीतेचे तत्त्वज्ञान सुबोध भाषेत मांडले आहे. नामस्मरणावर महाराजांचा विशेष भर आढळतो. अनेक पौराणिक पात्रांच्या, कथांच्या, दृष्टान्तांच्या माध्यमातून हरिपाठाचा महिमा सांगितलेला आहे. या अभंगांमधून देवाची आर्त प्रार्थना आढळते. आपली तमाम नाती महाराज भगवंताशीच जोडतात. आत्यंतिक गर्वामुळे प्रभु अंतरतो—हे जीवनसत्य महाराजांनी आपल्या अभंगांमधून सांगितले आहे. मूर्तिपूजेतील अवडंबराचा जाहीरपणे धिक्कार करीत महाराजांची वाणी संत कबीरदासांप्रमाणे गर्जताना दिसते. मूर्तीतल्या देवापेक्षा व्यापक परब्रह्माची चर्चा

व चिंतन माणसाने करावे हे सांगणारा हरिपाठाचा १५ वा अभंग नितान्त रमणीय आहे.—

● काष्ठ पाषाण मृत्तिकेची मूर्ति। तेथे भगवती नाही नाही।
पोटी नाही भाव फिरती देशोदेशी। म्हणती हृषिकेशी पाव आता।
पाषाणाची मूर्ती लावोनिया शेंदूर। आमचा रघुवीर हाचि आहे।
शंकर ऐसे बोलती वाचाळ। व्यर्थ निर्जीव शिळा पूजताती।

काव्यसौंदर्य

महाराजांच्या अभंगातील कवित्व केवळ विलक्षण आहे. त्यांना संसार पारध्याच्या फासाप्रमाणे वाटतो. बगळा ज्याप्रमाणे माश्याला टिपून घेतो त्याप्रमाणे मानव काळाचा ग्रास बनेल ही उपमा अत्यंत प्रत्ययकारी आहे. कासवीच्या कृपादृष्टीने पिलांची तहानभूक निवते तशी देवाने दया करावी अशी ते प्रार्थना करतात. बीजात वृक्षाची शक्यता असावी तसेच भगवंतात विश्व सामावलेले आहे व वृक्ष लयाला जाताच पुनरपि बीजरूपाने अवशिष्टच राहतो तद्वतच भगवंत व विश्वाचे नाते आहे असे ते सांगतात. स्थान किंवा गाव न सोडता, माणसाने जर वृत्ती बदलली तर देव दूर नाही हे सांगताना महाराज म्हणतात की, आंधळ्याच्या पुढे उत्तम दर्पण ठेवून काय उपयोग? कावळ्याला चंद्रम्याची महती काय ठाऊक! काव्याच्या दृष्टीने अत्यंत उत्तम असा अंतिम २९वा अभंग मुळातूनच वाचण्यासारखा आहे. तो असा—

● काष्ठाचिया पोटी गुप्त वैश्वानर। तैसा सर्वेश्वर याच देही।
मृगाचिया पोटी गुप्त बा कस्तुरी। तैसा तो श्रीहरी याच देही।
क्षीरसागरासी तो का शेषशाई। तोचि आपुल्या देही नांदतसे।
शंकर म्हणे ऐका भगवंत प्राप्ती। भेटतो श्रीपति आपुल्याचि मिषे।

महाराजांच्या अभंगरचनेवर संतश्रेष्ठ तुकोबारायांचा स्पष्ट प्रभाव ठायी ठायी आढळतो. एक उदाहरण बघू या! तुकाराममहाराजांच्या या ओळी—

● सकलांच्या पाया माझे दंडवत। आपुलाले चित्त शुद्ध करा।

व शंकरमहाराजांच्या पुढील ओळी बघा—

● म्हणोनिया तुम्हा येतो काकुळती। भजा रघुपती एकनाम।

शुद्धात्मज्ञानबोध : श्रीकृष्ण उद्धव संवाद

महाराजांची कविता पराकोटीच्या तरल, उत्कट, तलस्पर्शी व रसरशीत जीवनानुभवातून स्फुरलेली आहे. काव्याचा मनोरम घाट लाभलेले महाराजांचे तत्त्वज्ञान नितान्त रमणीय आहे.

महाराजांचे परमभक्त व त्यांच्या अनेक आठवणींचा आश्चर्यकारक साठा असलेले वयोवृद्ध सेवानिवृत्त शिक्षक आदरणीय श्री. तु. ना. शिंपी यांनी १९८२ साली महाराजांचा 'शुद्धात्मज्ञानबोध'—काव्यग्रंथ प्रकाशित केला. आपला ऐंशीवा वाढदिवस गुरुजींनी सदर ग्रंथ प्रकाशित करून अद्‌भुतपणे साजरा केला.

तत्त्वज्ञान व भक्ती

उद्धव-भगवंत संवादरूपाने लिहिलेला हा काव्यग्रंथ नितान्त रमणीय आहे. ग्रंथारंभी केलेल्या मंगलाचरणात श्रीगणेश, श्रीसरस्वती, श्रीसद्‌गुरु, आदिपुरुष दिगंबर, श्रीपांडुरंग, श्रीदत्तात्रेय प्रभूंना वंदन करून महाराजांनी ग्रंथारंभ केलाय.

गीतेतील 'विमूढा नानुपश्यन्ति पश्यन्ति ज्ञानचक्षुषा' या श्लोकाचा महाराजांच्या प्रज्ञेला स्फुरलेला दैवी अन्वय पुढील ओळीत साकार झालाय—

● ज्ञानदृष्टि जे पहात। त्यासी जवळी आहे मी भगवंत।
अभक्तांसी न दिसे सत्य। कोटी जन्म घेता ही ॥ २० ॥

गीतेतील विभूतियोगात भगवंताने आपल्या विभूती अर्जुनाप्रत कथन केल्या आहेत. तसेच वर्णन या ग्रंथाच्या २१ ते ३१व्या ओळीपर्यंत व पुढे ८५ ते ८७ व्या ओवीपर्यंत आढळते. मायेमुळे जीव ब्रह्मतत्त्वापासून दुरावतो हे सांगताना महाराज म्हणतात—

● भक्त करिती माझे ध्यान। मी हे आपणच पुढे सरसावोन।
माझिया भक्ता भुलवोन। पाडि विसर माझाचि हे ॥ ८१ ॥
उद्धवा ऐसी हे माया राणी। इची विपरीतचि करणी।
इने मोठेमोठे तत्त्वज्ञानी। खाली हाणूनी पाडिले ॥ ८२ ॥

काव्यरसाच्या दृष्टीनेही प्रस्तुत ग्रंथ अभ्यासण्यायोग्य आहे. उत्प्रेक्षा अलंकाराचे उदाहरण—

● ऐसे श्रीकृष्ण बोलले। उद्धवास कैसे वाटले।
जैसे सुखाचे समुद्र लोटले। मेघ चातक न्यायेसी ॥ ४१ ॥

अतिशयोक्ती अलंकारचे उदाहरण—

● मेघाचे थेंब किती। हेही एक वेळा होई गणती।
आकाशी पायी चढती। परी माझी स्थिती अगम्य ॥ ६७ ॥
होईल सृष्टीचे वजन। गणवेल समुद्राचे जीवन।
जमिनीवरी किती तृण। मोजवेल गणिता ते ॥ ६८ ॥
आकाश आहे किती विती। हेही करिता येईल गणती।
परी माझे गुण निश्चिती। न वर्णवती कोणाते ॥ ६९ ॥

उपमा सौंदर्याच्या दृष्टीने महाराजांची कविता अनेक ठिकाणी मन मोहून टाकते.

● राये सोन्याचे घर केले । दुबळे मातीचे रचिले ।
परि साऊलीचे सुख कमी आगळे । नसेचि जाण सर्वथा ॥ १४ ॥

'शुद्धात्मज्ञानबोध' ज्या १३६ व्या ओवीवर संपून जातो तिथे तो संपायला नको असे वाटते. या ग्रंथाचा आणखी भाग अवशिष्ट असावा कारण की उद्धवाने मोठ्या काकुळतीला येऊन १३६ व्या ओवीत प्रश्न विचारलाय की—

● जगी नाना देह धरिशी तू एक । गुण कर्मे कैसी दिसती अनेक ।
अधम उत्तम भेद बहुदेख । असोनिया एक अनेक का ॥ १३६ ॥

उद्धवाच्या या प्रश्नाला उत्तर न देताच- 'हरिः ॐ तत्सत्' म्हणून ग्रंथ पूर्ण केल्याचे आढळते.

अवघ्या ३० वर्षांच्या वयात महाराजांचे देदीप्यमान जीवन अनेकांना लाभप्रद ठरले. कुठल्याही चमत्कारावर विश्वास ठेवू न देणारे महाराज साध्या जीवनपद्धतीचे व आवडंबरहीन आचारधर्माचे प्रवक्ते होते. त्यांचे प्रत्यक्ष आचरण शुद्ध, सात्त्विक होते. आज त्यांच्या आठवणी सांगणारे सर्वश्री तुकाराम नागो शिंपी व वेडू रामजी पाटील हयात आहेत. शिंपी गुरुजींना महाराजांचा खूप सहवास घडला व चमत्कृतिवीण साध्या जीवनाचा आदर्श वस्तुपाठ असे महाराजांचे जीवन होते असे ते म्हणतात. महात्मा म्हटला की अनेक दंतकथा व चमत्कारिक कथांची वलये त्यांच्या व्यक्तिमत्त्वाभोवती उभी राहतात. शंकर महाराज काही त्याला अपवाद नाहीत. पण ते स्वतः यापासून मुक्त होते. अलिप्त होते. निःसंग होते.

श्रीशंकरमहाराज अध्यात्मसंपन्न, वीतराग, संन्यस्त वृत्तीचे थोर संतकवी होते. वेदाध्ययन, षड्शास्त्रांचा अभ्यास, संतसाहित्याची सूक्ष्म अध्ययनशैली, तत्त्वज्ञानाची तपशिलवार संगती, माफक तीर्थयात्रा त्यांच्या जीवनाचे ठळक विशेष आहेत. तर तरल, सुबोध प्रसाद गुणांनी युक्त काव्य, अलंकारांची सहज आवर्तने, दैनंदिन जीवनातील साधे-सोपे दृष्टान्त, भाषेचा अंगभूत गोडवा त्यांच्या काव्याचे ठळक विशेष म्हणून नोंदवता येतील. नामजपाचा आग्रह, अभिमानरहित जीवनव्यवस्था, सर्वांभूती समानत्व, मूर्तिपूजेतील ढोंगीपणाचा विरोध या तत्त्वांचा त्यांनी जीवनभर पुरस्कार केला. कुणापाशी काहीही न मागता अयाचक वृत्तीने जगणारा आणि अत्यंत अल्पावधीतच संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांप्रमाणे आपले जीवितकार्य संपले या कृतार्थतेच्या भावनेने ब्रह्मलीन होणारा हा महापुरुष वंदनीय आहे. यांचे ३७४० अभंगांचे 'अभंग रामायण' अजूनही प्रकाशनाची वाट बघत आहे. सप्तकांडात निबद्ध रसाळ अभंगांनी युक्त असे हे महाकाव्य काव्य, तत्त्वज्ञान व भक्तीचा त्रिवेणी संगम आहे.

जिजाबाईंची सासू : उमाबाई

सौ. विजया प्र. देशपांडे

मराठ्यांच्या इतिहासात राजमाता जिजाबाई हिची कामगिरी असामान्य गणली जाते. शिवाजीमहाराजांच्या स्वराज्यकार्याला प्रेरणा आणि आशीर्वाद देण्याची महत्त्वपूर्ण कामगिरी जिजाबाईंनी बजावली. शिवरायाच्या स्वराज्यकार्यात राजमाता जिजाबाईने प्रत्यक्ष सहकार्य केलेलेही आढळते. १६६० मध्ये सिद्दी जोहारच्या वेढ्यामुळे शिवाजीमहाराज पन्हाळ्याच्या किल्ल्यात अडकले होते, तेव्हा जिजाबाई वेढा मोडून काढण्यासाठी राजगडाहून निघण्याच्या तयारीत होत्या. अशी माहिती शिवभारतामध्ये मिळते. तिनेच नेताजी पालकर आणि सिद्दी हिलाल यांना पन्हाळ्याचा वेढा मोडून काढण्यासाठी पाठवले. शिवाजीमहाराज आग्र्याला गेले तेव्हा स्वराज्याचा कारभार पाहण्याची जबाबदारीही तिने पार पाडली. जिजाबाईच्या कर्तबगारीचे कितीतरी पुरावे ऐतिहासिक साधनामध्ये उपलब्ध आहेत. जिजाबाईंची सासू म्हणजे शहाजीची आई उमाबाई—ही देखील एक कर्तबगार स्त्री होती. म्हणून भोसले घराण्यातील कर्तबगार स्त्रियांची परंपरा उमाबाईपासून सुरू झाली, असे म्हणता येईल. मराठ्यांच्या इतिहासात उमाबाईंची कर्तबगारी उपेक्षित राहिली आहे. प्रस्तुत निबंधात उमाबाईच्या कर्तबगारीचा आलेख रेखाटण्याचा प्रयत्न करीत आहे.

उमाबाईचे माहेरचे नाव दीपाबाई. फलटणचे नाईक निंबाळकर देशमुख यांची ती कन्या होती. इतिहासकार श्री. वा. सी. बेन्द्रे यांच्या मताप्रमाणे दीपाबाईचा जन्म १५८३ च्या सुमारास झाला असावा.[१] मालोजी आणि दीपाबाईच्या विवाहासंबंधीची माहिती चिटणीस बखर, शेडगावकर बखर, पंडितराव यांची बखर, शिवभारत,—इत्यादी साधनग्रंथांत आलेली आहे. चिटणिसांनी उमाबाईचे सासरचे नाव दीपाबाई होते असे गृहीत धरलेले आढळते.

"'मालोजी राजास' निंबाळकर यांची कन्या दिली. तिचे नाव दीपाबाई असे ठेवले"[२] न्यायशास्त्री पंडितराव बखरीत पुढीलप्रमाणे मजकूर आढळतो : "लक्ष्मणराव उपाध्ये हे जगपाळराव नाईक यांची बहीण दीपाबाई पाहून आले."[३] या उल्लेखावरून उमाबाईचे माहेरचे नाव दीपाबाई होते, हे स्पष्ट होते.

शिवभारतामध्ये उमाबाईविषयी बराच मजकूर आलेला आहे. त्यावरून उमाबाई हे सासरचे नाव होते याची खात्री पटते. शिवाय शिवभारतातील माहितीवरून उमाबाई कर्तृत्ववान होती, असेही दिसून येते. शिवभारतातील उमाबाईविषयीचा मजकूर मराठीत पुढीलप्रमाणे सांगता येईल—' ज्याप्रमाणे सत्यवानाने सावित्रीशी विवाह केला, त्याप्रमाणे राजाने (मालोजीने) मोठ्या कुळात जन्मलेल्या उमा नावाच्या सुलक्षणी कन्येशी लग्न केले. मग रघुराजाचा पुत्र श्रीमान हा जसा साध्वी इंदुमतीला मानत असे, तसा तो मालोजी हा अनुरूप गुणांनी पंडित असा आपल्या पत्नीला फार मानू लागला. पार्वतीने जणूकाय प्रसाद म्हणून दिलेले आपले उमा हे नाव ती साध्वी उमा भूषवती झाली. नंतर कुबेराप्रमाणे संपन्न, बुद्धिवान आणि ज्ञानवान अशा त्या राजाने आपल्या लावण्यवती पत्नीसह अनेक प्रकारची धर्मकृत्ये केली.'[४] राधामाधवविलास-चंपू या ग्रंथातही मालोजीच्या पत्नीचे नाव उमाबाई होते असा स्पष्ट उल्लेख आलेला आहे. उमाबाईने धर्मकृत्ये केल्याची माहिती कागदपत्रांवरूनही मिळते. १२ डिसेंबर १६४४ च्या शहाजीच्या एका पत्रात श्रीघृष्णेश्वर देवाच्या अभिषेकार्थ सालिना होन १७ मातुश्री उमाबाई आबासाहेबांनी दिधला होता. असा उल्लेख आलेला आहे.[५]

मालोजी आणि उमाबाई यांची पिरावर भक्ती होती, अशी माहिती बखरकरांनी दिलेली आहे. चिटणीस बखरीमध्ये म्हटले आहे की उमाबाईने पुत्रप्राप्तीसाठी अहमद-नगरच्या पीर शहाशरीफला नवस केला, आणि पुत्रप्राप्तीनंतर आपल्या पहिल्या मुलाचे नाव शहाजी व दुसऱ्या मुलाचे नाव शरीफजी असे ठेवले.[६] ९१ कलमी बखरीतही अशा आशयाची माहिती आलेली आहे. ही हकिकत अनेक इतिहासकार अविश्वसनीय मानतात. कारण शरीफजी हे नाव भोसले वंशात पूर्वीपासून रूढ होते. १४ मार्च १५६८ च्या एका पत्रात भोसले वंशातील शरीफजी नाव आलेले आहे.[७] एक गोष्ट मात्र खरी की शहाशरीफच्या दर्ग्याला शहाजीच्या काळापासून देणग्या मिळालेल्या दिसतात.[८]

उमाबाईच्या पोटी शहाजीचा जन्म इ. स. सन १६०० किंवा १६०१ च्या सुमारास झाला. त्यानंतर केवळ पाच वर्षांनीच म्हणजे १६०५ मालोजी इंदापूरच्या लढाईत मारला गेला. अर्थात त्याच वेळी शहाजीचे वय केवळ पाच वर्षांचे होते. शरीफजी त्याच्यापेक्षा लहान होता. मालोजीच्या मृत्यूचा प्रसंग शिवभारतात आलेला असून विठोजीने म्हणजे मालोजीच्या भावाने उमाबाईला सती जाण्यापासून कसे परावृत्त केले, याची माहिती शिवभारतकारांनी दिलेली आहे.

स्वतःचे डोळे अश्रूंनी भरले असतानाही तो महान बुद्धिमय विठोजी पतिशोकाने विव्हळ झालेल्या आपल्या भावजयीचे सांत्वन करण्यासाठी गळा दाटून आलेल्या स्वरात म्हणाला, " हे थोर मनाच्या स्त्रिये हा मृत्युलोक असत्य आहे. हे लक्षात आणून तू शोक टाकून दे. तुझा पती आपल्या आप्ताला सोडून स्वर्गात गेला आहे.

शत्रूच्या शस्त्रप्रहारांनी मरण यावे असेच शत्रूस पाठ न दाखवणारे शूर योद्धे इच्छितात. हे देवी, शहाजी व शरीफजी हे तुझे पाणीदार पुत्र उगवलेल्या तेजस्वी सूर्याप्रमाणे शोभत आहेत. वीरमातेच्या पोटी जन्मास आलेल्या या तुझ्या दोघा कुलदीपक पुत्रांचे अखिल जगात उज्ज्वल यश पसरेल. हे दोघे कोवळे वयाचे असून त्यांचे जीवित तुझ्यावरच अवलंबून आहे. म्हणून तू माझ्या विनंतीला मान देऊन तरी धीर धर व या दोघांच्या रक्षणाकरिता तरी प्राण धारण कर."[९]

विठोजीच्या आग्रहामुळे उमाबाईने सती जाण्याचा बेत रहित केला असे शिवभारतावरून दिसते. शहाजीच्या मृत्यूची बातमी ऐकून जिजाबाईने सती जाण्याची तयारी केली होती. परंतु शिवाजीमहाराजांच्या आग्रहावरून तिने आपला सती जाण्याचा बेत रहित केला अशी माहिती सभासदाने आपल्या बखरीत दिलेली आहे.[१०] उमाबाई आणि जिजाबाई यांनी वैधव्यदशा सहन करून आपल्या पुत्रांच्या कार्याला आशीर्वाद दिले असे दिसून येते.

मालोजीच्या मृत्यूनंतर जहागिरीचा सांभाळ करण्याची जबाबदारी शहाजी लहान असल्यामुळे विठोजीवर आली. १६१०–११ च्या सुमारास शहाजीचे लग्न लखुजीराव जाधव यांची कन्या जिजाई हिच्याशी झाले. १६११–१२ मध्ये शरीफजीचे लग्न विश्वासराजाची मुलगी दुर्गा हिच्याशी झाले. याच विश्वासराजाच्या वंशातील जयंती नावाच्या मुलीचे शहाजीचा मुलगा संभाजी याचेबरोबर पुढे लग्न झाले. त्यामुळे शिवनेरी किल्ल्याचा भोसले घराण्याशी संबंध आला.

शहाजीच्या जहागिरीचा सांभाळ विठोजी जरी करीत होता तरी उमाबाईचा या कार्यात सहभाग होता. विठोजीच्या मृत्यूनंतर १६१३ नंतर शहाजीकडे पूर्ण सूत्रे आली. त्या वेळी शहाजीचे वय १२ वर्षांचे होते. शहाजी अतिशय मातृभक्त होता. शिवभारतकारांनी म्हटले आहे, " नंतर आपला चुलता विठोजी राजा हाही परलोकवासी झाला असा राजनीती जाणणाऱ्या आईच्या आज्ञेत वागणाऱ्या महापराक्रमी धैर्यवान व बुद्धिमान शहाजीराजाने तो राजाचा मोठा भार आपल्या शिरावर घेतला. "[११]

विठोजीच्या मृत्युसमयी शहाजी केवळ १२ वर्षांचा होता. शिवभारतकारांनी जरी शहाजीने जहागिरीचा भार आपल्या शिरावर घेतला असे म्हटलेले असले तरी एवढ्या लहान वयात त्याला कोणाचे तरी मार्गदर्शन व प्रेरणा आवश्यक होती. अर्थात उमाबाईने जहागिरीचा सांभाळ करण्यास शहाजीला मार्गदर्शन केले असणे अत्यंत स्वाभाविक आहे. सासरी आलेल्या लहानग्या जिजाबाईला आपल्या सासूचे हे कर्तृत्व जवळून पाहावयास मिळाले. पुढे कालांतराने १६२६ मध्ये शहाजीने आदिलशहाची नोकरी पटकावली. कर्नाटकातील जहागिरीकडे जाताना पुणे जहागिरीचा 'पोट मोकासा' ६ वर्षांच्या लहानग्या शिवाजीच्या नावे करून दिला. अर्थातच त्या पुणे

जहागिरीचा सांभाळ करण्याची जबाबदारी पर्यायाने जिजाबाईवर आली.

शहाजीचा उत्कर्ष १६२४ मध्ये भातवडीच्या लढाईत झाला. तेव्हापासून आपला स्वतंत्र बाणा दर्शविण्यास प्रारंभ केला. १६२९ पर्यंत उमाबाई हयात होती असे कागदपत्रावरून दिसून येते.[१२] १६२९ मध्ये जिजाबाई गरोदर असताना शिवनेरी किल्ल्यावर तिच्यासमवेत उमाबाई होती. त्याशिवाय शरीफजीची बायको दुर्गा ही माहेरी म्हणजे शिवनेरीवर होती. शिवाजीमहाराजांच्या जन्मप्रसंगी उमाबाई हयात होती किंवा नाही हे समजण्यास साधन उपलब्ध नाही.

आतापर्यंत केलेल्या विवेचनावरून उमाबाई ही धार्मिक प्रवृत्तीची सत्त्वशील स्त्री तर होतीच, परंतु पतीच्या आणि दिराच्या निधनानंतर जहागिरीचा सांभाळ करण्याचे कर्तव्य तिने बजावले ही गोष्ट सिद्ध होते.

संदर्भ

(१) मालोजीराजे व शहाजी महाराज, वा. सी. बेंद्रे, पृ. ९७
(२) चिटणीस बखर, पृ. ३२.
(३) न्यायशास्त्री पंडितराव बखर, पृ. १
(४) शिवभारत, १, ४९, ५२.
(५) रामदास आणि रामदासी, वर्ष ६, अंक ६५–६६, लेख ५.
(६) चिटणीस बखर, १३–१४.
(७) मालोजीराजे व शहाजी महाराज, पृ. १२९.
(८) तत्रैव, पृ. १२८.
(९) शिवभारत अ. १, पृ. १३–१७.
(१०) सभासद बखर.
(११) शिवभारत, अ. २ व ३.
(१२) मालोजीराजे व शहाजी महाराज, पृ. ४२२–४२३.

वणी दिंडोरीची लढाई

प्रा. कु. सुनंदा आहिरे

आग्ऱ्याहून परत आल्यानंतर शिवाजीमहाराजांचा मुघलाशी तीव्र स्वरूपाचा संघर्ष सुरू झाला. १६७० पासून ते १६७२ पर्यंत बागलाण भागात मराठा मुघल संघर्षाची तीव्रता अधिक होती. या २–३ वर्षांच्या काळात मुघल आणि मराठे यांच्यांत अनेक चकमकी झाल्यात. त्यामध्ये 'वणी दिंडोरीची लढाई' आणि 'साल्हेरची लढाई' या दोन लढाया विशेष प्रसिद्ध आहेत. ऑक्टोबर १६७० मध्ये शिवाजी-महाराजांनी सुरतेवर दुसरी स्वारी केली. ही स्वारी करताना शिवाजीमहाराजांनी सुरतेच्या परिस्थितीचा फायदा घेतला होता. कारण सुरतेचा सुभेदार मरण पावल्याने तेथील शिबंदी मुघलांनी काढून घेतली, आणि केवळ हजाराच्या जवळपास सैन्य सुरतेत होते. बहुधा ही बातमी शिवाजीमहाराजांना हेरामार्फत कळली असावी. त्याप्रमाणे ३ आक्टो. १६७० रोजी सुरतेवर स्वारी करून ३ दिवस मराठ्यांनी सुरत लुटले. या वेळी शिवाजीबरोबर मोठे मोठे मराठे सरदार होते. सुरतेहून परत जाताना साल्हेर, मुल्हेर, चांदवड या मार्गाने कंचनमंचन घाटाकडे जाऊन कोकणात उतरण्याची शिवाजीची योजना होती. परंतु शिवाजीच्या हालचालीची बातमी मुघलांना समजली. या वेळी मुघलांचा तळ वैजापूर येथे होता. खानदेशाचा सुभेदार दाऊदखान कुरेशी याला ही बातमी मुल्हेरचा किल्लेदार नेकनामखान याच्याकडून समजली. त्याप्रमाणे दाऊदखानाने मराठ्यांचा पाठलाग सुरू केला, आणि कंचनमंचनच्या घाटाजवळ मराठे आणि मुघल यांच्यात लढाई झाली. ही लढाई 'वणी दिंडोरीची लढाई' म्हणून प्रसिद्ध असून या लढाईचा शिवाजीमहाराजांच्या युद्धकौशल्याचा पुरावा म्हणून उल्लेख करता येईल. वणी दिंडोरीच्या लढाईची माहिती प्रामुख्याने सभासद बखर या मराठी साधनग्रंथात आणि तारिख–ए–दिल्कुशा या फारसी साधन-ग्रंथात पाहावयास मिळते. या दोन्हीही साधनग्रंथांतील माहितीचा चिकित्सक दृष्टीने अभ्यास करून हा निबंध लिहिण्याचा प्रयत्न करीत आहे.

तारिख–ए–दिल्कुशाचा लेखक भीमसेन सक्सेना हा या प्रसंगी दाऊदखान कुरेशीच्या चाकरीमध्ये होता. वणी दिंडोरीच्या लढाईचा तपशील त्याने आपल्या

ग्रंथात सविस्तर दिलेला असून मराठ्यांचा पराभव झाला अशी खोटी माहिती त्याने बेधडक दिलेली आढळते. त्यावरून दरबारी लेखक आपल्या तवारिखामध्ये चुकीची माहिती कशी देत असत याची कल्पना येते. दाऊदखान कुरेशी हा अरब सरदार असून मुघल सम्राट औरंगजेब याच्या विश्वासातील होता. ज्या वेळी शिवाजीमहाराज सुरतेची लूट करून कंचनमंचनच्या घाटाकडे जाऊ लागले त्या वेळी दाऊदखानाने मराठ्यांचा पाठलाग सुरू केला.

भीमसेन लिहितो, " दाऊदखान चांदूरकडे रवाना झाला. शिवाजीची वाट आडवावी असा त्याचा हेतू होता. संध्याकाळच्या सुमारास चांदूरजवळ तो पोहोचला. तेथील सरदार बाकीखान हा मराठ्यांच्या आक्रमणामुळे किल्ल्यावर गेला होता. तो खाली येऊन दाऊदखानाला भेटला. या सुमारास रात्र झाली होती. [1]

शिवाजीने कंचनमंचन घाट गाठल्याची माहिती गुप्तहेराने दाऊदखानाला पोहोचविली तेव्हा रात्र असतानाही त्याने पाठलाग सुरू केला. भीमसेन लिहितो : " रात्र अंधारी होती. दाऊदखानाच्या सैन्याची वाट चुकली. त्यामुळे सूर्य उगवेपर्यंत थांबून रहावे लागले. बुणगेपण पाठीमागे आले." [२]

या माहितीवरून बागलाण भागातील रस्ते नेहमी चुकत असत. मराठ्यांना या परिस्थितीचा सहजासहजी फायदा मिळत असे. कांचनबारीच्या घाटमाथ्यावर मराठे आणि मुघल यांच्यामध्ये युद्ध झाले म्हणून 'ही लढाई वणी दिंडोरीची नसून कांचनबारीची लढाई आहे' असे मत सेतु माधवराव पगडी यांनी मांडलेले आढळते. [३]

मुघल सैन्यातील अधिकाऱ्यांची नावे भीमसेनाने दिलेली आहेत ती पुढीलप्रमाणे– राममकरंद, शेख सफी, पुरोहित थाल, संग्रामखान, बाकीखान, इब्राहीम पन्नी हे पिछाडीला होते तर इखलासखान व स्वतः दाऊदखान हे स्वतः पुढे होते. भीमसेनाने दिलेल्या या रचनेवरून मुघलांच्या फौजेची तीन भागांत विभागणी झाली होती, असे दिसते. मराठ्यांचे सैन्य १५ हजारापर्यंत होते आणि मुघलांचे मात्र कमी होते अशी माहिती भीमसेनाने दिलेली आहे. [४]

या लढाईच्या वेळी स्वतः शिवाजीमहाराज आणि अनेक ज्येष्ठ मराठे सरदार उपस्थित होते. त्यांची नावे सभासदाने दिलेली असून मकाजी आनंदराव, बंकाजी दत्तो, मोरोपंत पिंगळे, निळोपंत अण्णाजी पंत, दत्ताजी पंत, बाळाजी प्रभु हे या प्रसंगी मराठे सैन्यात होते. [५]

प्रत्यक्ष लढाईचा तपशील सभासदाने दिलेला आहे. " (मुघलांनी) राजियांस गाठले. गनीम आला ऐशी खबर कळली. राजा खासा घोड्यावर बसून बख्तर घुगी घालून हाती पट्टे चढवून, मालमत्ता घोडी पाईचे लोक पुढे रवाना करून आपण दोन हजार स्वारानिशी सडे सडे दाऊद उभे राहिली. वणी दिंडोरी म्हणवून शहर

आहे, ते जागा उभे राहून सुभ्याचे लोक आले, त्यांशी घोरावर युद्ध केले. राजियांनी आपली फौज पुढे करून पाठीवर आपण खासा राहून झगडा दिधला. प्रतापराव सरनोबत व व्यंकोजी दत्तो व आनंदराव वरकड सरदार पुढे होऊन मोठी कत्तल केली आणि मोगल मारून मुरदे पाडिले. दोन प्रहर युद्ध जाले. मराठे यांनी शर्त केली. तीन हजार मोगल मारिले. तीनचार हजार घोडे पाडाव केले. दोन वजीर मोगलाई सापडले. असे फत्ते करून आले." [६] या वर्णनावरून शिवाजीमहाराजांची युद्ध-योजना लक्षात येते.

मुघल सैन्य पाठलागावर आलेले लक्षात येताच शिवाजीमहाराजांनी पोलादी चिलखत धारण केला (बख्तर), शिरस्त्राण धारण केले (घुगी). हातामध्ये पट्टा घेऊन ते स्वतः युद्धसज्ज झाले. लुटीतील मालमत्ता व निवडक लोक पुढे रवाना करून शिवाजीमहाराजांनी मुघलाशी लढाई केली. या युद्धाच्या वेळी आपल्या बिनीचे सरदार प्रतापराव, व्यंकोजी दत्तो व आनंदराव यांना आघाडीवर ठेवून स्वतः शिवाजीमहाराजांनी मार्गदर्शन केले. या युद्धात मराठ्यांचा जय झाला असे सभासदाने म्हटले आहे. शिवाजीने मुघलांना कशा प्रकारे तोंड दिले याची माहिती रियासतकार सरदेसाई यांनी पुढीलप्रमाणे दिली आहे : " त्याने आपल्या फौजेच्या चार लहान लहान टोळ्या केल्या. शिवाय लूट घेऊन जाण्यासाठी त्याने एक निराळीच टोळी नेमली. तिच्या तंत्राने व शत्रूचे धोरण राखून इतर टोळ्यांनी वर्तावे असे त्याने ठरविले, आणि आपण औरंगाबाद घेण्यास जातो अशी हूल उठविली. दोन टोळ्यांनी मोगल फौजेच्या आगे मागे राहून तीस हैराण करण्याचा क्रम चालविला." [७]

या माहितीवरून आघाडीस प्रत्यक्ष लढा चालू असताना पिछाडीहूनही शत्रु-सैन्यावर मारा करण्याचे शिवाजीमहाराजांचे खास तंत्र होते हे लक्षात येते.

भीमसेन सक्सेना याने दिलेल्या माहितीवरून मुघलांचे युद्धतंत्र या वेळी पूर्णपणे फसले असे दिसून येते. भीमसेन लिहितो : " इखलासखानाने आपल्या सैन्यास तयार राहण्यास सांगितले. त्याच्यापाशी शस्त्रास्त्रांचा साठा असलेले काही उंट होते. त्याचे सैनिक चिलखते वगैरे चढवून तयार होऊ लागले. इखलासखान हा तरुण होता. त्याने सारासार विचार केला नाही. आपल्याबरोबर असलेली थोडी माणसे घेऊन तो शत्रूवर तुटून पडला. मराठ्यांचे सैन्य पंधरा हजारांच्यावर असावे. त्यांच्याशी तो लढू लागला. युद्धाच्या गर्दीत इखलासखान यास जखमा लागून तो जमिनीवर कोसळला." [८] दाऊदखानाप्रमाणे संग्रामखान घोरी आणि इतर अनेक मुघल सरदार जखमी झाले. रायमकरंद व भान पुरोहित यांनी मराठ्यांविरुद्ध तोफा डागल्या. हे सारे युद्ध चालू असेपर्यंत दाऊदखान तेथे येऊन पोचला. जखमी इखलासखानाला सुरक्षित स्थळी नेऊन दाऊदखानाने मराठ्यांविरुद्ध लढा चालू ठेवला. भीमसेन लिहितो : " मराठे आपल्या पद्धतीने (याला बारगिरी म्हणतात) लढू लागले. मोगल सैन्याभोवती ते

चहुकडून घिरट्या घालू लागले. "[९]

या वर्णनावरून मराठ्यांनी आपल्या नेहमीच्या गनिमी काव्याचा उपयोग कंचन-बारीच्या लढाईच्या वेळी केला असे दिसून येते.

मुघलांवर मराठ्यांनी अचानक कसा हल्ला केला याचे वर्णनही भीमसेनाने दिलेले आहे. चढउताराची वाट असल्यामुळे मुघल सैन्याची ताटातूट होत असे. अशी ताटातूट झाली म्हणजे मराठे त्यांच्यावर तुटून पडत; आणि शस्त्रे, घोडे हिसकावून घेत. पाठी-मागील कुमक मुघलांना भिडेपर्यंत मराठे मैदान सोडून जात. या तंत्राचे मार्मिक वर्णन भीमसेनाने दिलेले आहे.[१०]

भीमसेनाने दिलेल्या वर्णनावरून कांचनबारीच्या घाटाच्या परिसरात असलेल्या डोंगराळ वाटांचा मराठ्यांनी पुरेपूर फायदा घेतला, असे दिसून येते. भीमसेन " मराठे पळून गेले व मोगलांचा विजय झाला " असे लिहितो[११] परंतु त्याच्या वर्णनावरून असे स्वच्छ दिसते की, मराठ्यांनी मोगलांची पूर्ण फजिती केली होती. त्यांची शस्त्रास्त्रे, घोडे आणि इतर सरंजाम पडलेला होता. अनेक सरदार जखमी झाले होते, हे सर्व लक्षात घेतल्यास मुघलांचा विजय कसा झाला हा प्रश्न निर्माण होतो.

सभासदाने अगदी थोडक्यात वर्णन केले आहे : " या युद्धात तीन हजार मोगल मारिले, तीनचार हजार घोडे पाडाव केले. दोन वजीर मोगलाई सापडले. असे फत्ते करून आले "[१२] त्यावरून मराठ्यांचे युद्धतंत्र लक्षात येते. शत्रूवर चहुबाजूने एकाच वेळी हल्ला करावयाचा, गोंधळ निर्माण झाल्यावर त्या परिस्थितीचा फायदा घेऊन शत्रूचा सरंजाम लुटावयाचा, शत्रूच्या शक्य तितक्या सरदारांना जखमी करावयाचे किंवा गारद करावयाचे आणि शत्रू सावध होऊन पुन्हा युद्धसज्ज होईपर्यंत पळून जावयाचे असे हे तंत्र होते. डोंगराळ आणि जंगलमय प्रदेशात हे तंत्र यशस्वी ठरत असे. मावळ आणि कोकण भागात शिवाजीमहाराजांनी याच तंत्राचा उपयोग आपल्या शत्रूविरुद्ध केला.

वणी दिंडोरी किंवा कांचनबारीच्या लढाईच्या वेळी या तंत्राचा त्यांनी मुघला-विरुद्ध यशस्वीपणे उपयोग करून घेतला.

संदर्भ :

१. मोगल आणि मराठे—पगडी, पृष्ठ. ३३
२. ,, ,, ,, , पृष्ठ. ३४
३. श्री छत्रपती व त्यांची प्रभावळ , पृ. ११७
४. मोगल आणि मराठे—पगडी , पृ. ३४
५. सभासद बखर पृष्ठ, ६०

६. सभासद बखर, पृ. ६१
७. मराठी रियासत खंड १ ला
शककर्ता शिवाजी, पृष्ठ १४३
८. मोगल आणि मराठे—पगडी, पृष्ठ ३४
९. ,, ,, ,,—,, ,, ३५
१०. ,, ,, ,,—,, ,, ३५
११. ,, ,, ,,—,, ,, ३५
१२. सभासद बखर— पृष्ठ ६१

छत्रपती प्रतापसिंहमहाराज यांची रोजनिशी

कु. अमिता रायरीकर

ऐतिहासिक ज्ञान हे अप्रत्यक्ष ज्ञान असते. हे अप्रत्यक्ष ज्ञान आपल्याला दोन प्रकारच्या इतिहासाच्या साधनांनी प्राप्त होते : (१) भौतिक साधने, (२) लिखित साधने. लिखित साधने ही जास्त महत्त्वपूर्ण, कारण मानसिक प्रक्रियांची ती द्योतक असतात. लिखित साधने ही सर्वसाधारणपणे आपल्याला चार उपप्रकारांमध्ये विभागता येतात : (१) शासकीय कागद, ह्यामध्ये जमाबंदी, पत्रे, सरकारचे जाहीरनामे इत्यादींचा समावेश होतो. (२) समकालीन वृत्तांत किंवा हकीगती, ह्यामध्ये प्रवासवृत्तांत, खासगी पत्रव्यवहार इत्यादींचा समावेश होतो. (३) आत्मचरित्रे, आठवणी (४) रोजनिशी.

रोजनिशी हा जिवंत व वास्तववादी दस्तऐवज आहे. रोजनिशी हा आत्मनिवेदनाचा एक प्रकार असला तरी चरित्र वा आत्मचरित्रापेक्षा हा दस्तऐवज अधिक मुक्त व स्वाभाविक असतो. त्यातून त्या व्यक्तीचा निकटत्वाने प्रत्यय येत असतो. एखाद्या व्यक्तीच्या मानसिक आणि बौद्धिक प्रक्रिया त्यामुळे आपल्याला समजतात. प्रत्येक व्यक्ती ज्या काळात जगते, वावरते त्या काळाचे व समाजाचे स्वाभाविक प्रतिनिधित्व व्यक्ती करीत असते. त्या काळातील राजकीय कल्पना, सामाजिक मूल्ये यांचा त्या व्यक्तीवर परिणाम होत असतो. म्हणजेच रोजनिशी ही आपल्याला व्यक्तिगत बाजू आणि त्याचबरोबर तत्कालीन, सामाजिक व राजकीय परिस्थिती दाखवू शकते.

मराठी इतिहासामध्ये १९ व्या शतकात सामाजिक कार्य केलेल्या व्यक्तीच्या रोजनिशा सापडतात. परंतु एखाद्या राज्यकर्त्याची रोजनिशी म्हणून प्रतापसिंहाची रोजनिशी हे बहुधा पहिलेच उदाहरण असू शकेल.

या रोजनिशीचे ॰६ हस्तलिखित खंड पुण्यातील पुरालेखागारमध्ये जतन केलेले असून ते पूर्णपणे मोडीमध्ये लिहिलेले आहेत. प्रत्येक हस्तलिखित खंड हा बांधीव असून प्रत्येक खंडामध्ये साधारणपणे ३०० पाने आहेत व त्यांचा आकार फूलस्केप एवढा आहे. प्रत्येक विजयादशमीला नवीन नोंदवही ही पद्धत दिसते. लेखनिकांचे उल्लेख रोजनिशीमध्ये कोठेही आढळत नाहीत. काही वेळा हस्ताक्षरामध्ये फरक

आढळतो. त्यावरून असे वाटते की त्यातील बराच भाग व ठरावीक प्रकरणे कारकुनाने लिहिलेली असून विशिष्ट कारभार किंवा गुप्त स्वरूपाची बोलणी स्वतः प्रतापसिंहाने लिहिलेली असावीत. काही वेळा काही घटनांच्या नोंदी त्याच दिवशी नमूद न करता ३/४ दिवसांनी केलेल्या आहेत अशी १/२ उदाहरणे सापडतात.[१] रोजनिशीमधील पहिली नोंद अश्विन शुद्ध नवमी शके १७४० म्हणजे ८ ऑक्टोबर १८१८ रोजीची असून शेवटची नोंद १६ नोव्हेंबर १८३८ अशी आहे. रियासतकार सरदेसाई यांनी ' पेशवे दफ्तरातील निवडक कागदपत्रे भाग–४२ ' या ग्रंथात रोजनिशीच्या शेवटच्या नोंदीची तारीख २७ सप्टेंबर १८३८ अशी दिलेली आहे; तर त्यांच्याच ' मराठी रियासत उत्तरविभाग भाग–३ 'मध्ये १८३७ असा उल्लेख आहे.[२]

ह्या लेखासाठी मी पहिले पाच खंड विचारात घेतले असून त्यामध्ये ८ ऑक्टोबर १८१८ ते कॅ. ग्रँटने प्रतापसिंहाकडे राज्यकारभाराची सूत्रे सुपूर्द करण्यापर्यंत म्हणजे ५ एप्रिल १८२२ या कालखंडाचा अंतर्भाव होतो. ग्रॅन्टची जेव्हा सातार्‍यामध्ये पोलिटिकल एजंट म्हणून नेमणूक झाली तेव्हा त्याच्यावर फार मोठी जबाबदारी होती. प्रतापसिंह राज्यकारभारामध्ये अननुभवी होता. त्याला राज्यकारभारामध्ये वाकबगार करणे आणि कंपनीची जरब त्याच्यावर ठेवून त्याचा विश्वास संपादन करणे हे त्याचे प्रमुख उद्दिष्ट होते. राज्याचा प्रशासक आणि प्रतापसिंहाचा शिक्षक अशी दुहेरी भूमिका ग्रँट बजावीत होता. या काळामध्ये राज्यकारभाराची मूलभूत चौकट त्याने प्रतापसिंहास आखून दिली आणि म्हणूनच व्यक्तिगत उमेदवारीच्या दृष्टीने राज्यकारभाराच्या प्रशिक्षणाचा कालखंड म्हणून हा कालखंड महत्त्वाचा ठरतो. व्यक्तिगत व त्याचबरोबर राजकीय दृष्टीने जडणघडणीचा कालखंड म्हणून हा कालखंड अभ्यसनीय आहे.

प्रतापसिंहाने रोजनिशी लिहिण्यामागची मूळ प्रेरणा ग्रँटचीच होय. ग्रँटनेच रोजनिशी लिहून ठेवण्याचा नियम प्रतापसिंहास लावून दिला. " मग (ग्रँट) बोलिले की महाराजांनी जे नित्यवृत्त होईल ते वहीवर ल्याहावे."[३] " महाराजांनी मेहनत करून लिहिणे सिकावे " असे ग्रँटला मनापासून वाटे. ग्रँट प्रतापसिंहाला लिहिण्यासंबंधी वारंवार विचारताना दिसतो. " आणिक तो बोलला की महाराज लिहितात किंवा नाही तेव्हा विठोबा बोलिले की लिहितात. परंतु कारकुनासारखे आताच आज कसे होईल कारण बाजीराव यांनी काही एक विद्या सिको दिली नाही. परंतु हाली लिहितात.[४] प्रतापसिंह स्वतः हिशेब पाहात असे, लिहीत असे, असे उल्लेख रोजनिशीमध्ये येतात.[५]

प्रतापसिंहाच्या रोजनिशीमधून आपल्याला त्या काळातील सामाजिक जीवन, राज्यकारभार पद्धती विशेषतः न्यायव्यवस्था, महसूल पद्धती, छत्रपती व जहागिरदार यांचेमधील संबंध, प्रतापसिंह व ग्रँट यांच्यामधील स्नेह, प्रतापसिंहाचे व्यक्तिमत्त्व व सम कालीन व्यक्ती इत्यादीविषयी माहिती मिळते.

त्या काळातील समाजव्यवस्था ही चातुर्वर्ण्यावर आधारलेली होती. जातिसंस्था अत्यंत प्रबळ होती. त्यामुळे 'सिवतासिवत', 'विटाळ' या कल्पना रूढ होत्या. ब्राह्मण-वर्गाला विशिष्ट सामाजिक स्थान व प्रतिष्ठा होती. धार्मिक रूढी आणि परंपरा यांचा प्रचंड पगडा समाजावर होता. शास्त्रार्थानुसार धार्मिक व सामाजिक व्यवहार चालत असत. प्रत्येक जातीला शास्त्रानुसार जे अधिकार दिलेले आहेत त्यानुसारच त्यांनी चालावे असा दंडक होता. फक्त ब्राह्मणवर्गालाच धार्मिक विधी हे वेदोक्त पद्धतीने करण्याचा अधिकार होता. इतर जातींतील लोक हे पुरणोक्त पद्धतीने धार्मिक विधी करीत. पंढरपूरमधील सोनार जेव्हा धार्मिक विधी वेदोक्त पद्धतीने करू लागले तेव्हा मामलेदारास ताकिद करण्यात आली की सोनारास "हुकूम देणे की तुमचे दस्तुराने चालावे" आणि "सोनारास पत्र सरकारी की तुम्ही आपले धर्मप्रधान चाल आसेल तसे करणे अधिक केले तर पारिपत्य होईल."[६] ह्या वेदोक्त व पुरणोक्त वादातून पुढील काळात ग्रामण्ये होऊन ब्राह्मणवर्गाचा रोष प्रतापसिंहाने ओढवून घेतला. नवससायास, देवास कौल लावणे, अभिषेक, लघुरुद्र, वेदपठण इ. धार्मिक आचार आपल्याला त्या काळात आढळतात. "मातुश्री माईची स्वारी लिंबचे बागेत गेली. येते वेळेस वीज मागे चारसे हातावर पडली त्याचे नवसाचे सवाषणी व गोंधल दुसरे दिवशी घातला आंबा-बाईचा माईंनी."[७] गाईचा व घोड्याचा लिलाव करण्यास बंदी होती. सातारा राज्या-मध्ये गोहत्येस सक्त मनाई होती.[८] गोहत्या करणाराचे पारपत्य केले जाई.

सतीची चाल प्रचलित होती. सरकारातून त्या बाईला चोळीलुगडे दिल्याचे उल्लेख रोजनिशीमध्ये आहेत.[९] परंतु सरकारकडून चवकशी केली जात असे की "कोणाचे जाचाने किंवा पोटाचेसाठी किंवा कशासाठी गरोदर किंवा लहान मूल असेल तर जाऊ नये."[१०] आणि मग परवागगी दिली जात असे.

त्या काळात गुलामगिरीची पद्धत आढळते. मुलींच्या विक्रीचे उल्लेख रोजनिशी-मध्ये दिसतात. कलावंतिणी नाचगाण्यासाठी मुली विकत घेत असत.[११] स्त्रीचे समाजा-तील स्थान हे अत्यंत दुय्यम होते. व काही वेळा कुटुंबामध्ये गुलामासारखी वागणूक तिला मिळत असे.[१२] स्त्रियांच्या व्यभिचाराचे अनेक उल्लेख रोजनिशीमध्ये येतात पण यासंबंधी त्या स्त्रीला शासन करण्याचा अधिकार हा त्या जातीच्या पंचायतीला दिलेला असे.

राज्यकारभाराचा कोणताच अनुभव प्रतापसिंहास नसल्यामुळे ग्रँट प्रतापसिंहाला तत्संबंधी धडे देताना आढळतो. "नंतर ग्रँट येऊन बोलिले ती कलमे वाकब व्हावे. गावचे पाहाणे व शेते व जमाखर्च पाहावा...आम्ही बोलिलो की कलमे आम्ही वाकब नाही तुम्ही वाकब करणे"[१३] प्रतापसिंहाने मेहनत केली पाहिजे असे ग्रँट वारंवर प्रताप-सिंहाला सांगतो. "राजाचे हातात सारे येईल परंतु महाराजानी मेहनत करणे म्हणजे मी सारे कामावर मगग्दूर करून देईन."[१४] "महाराजांनी दरबारखर्च कोणाचाही

खाऊ नये म्हणजे सारे माणसावर जरब राहील. " हे तो राजाला सांगे. साऱ्या लोकांना, कामगारांना सारख्या न्यायाने वागव व त्यांच्यावर जरब ठेव, "लाच खाऊ नये तरफदारी करू नये." याही सूचना तो राजाला देई. "शिलकी खजिना ठेव व कर्ज करू नको" हे ग्रँट प्रतापसिंहाला सतत सांगताना आढळतो.[१५] "राज्याचे कामावीसी एक दस्तुर कामाचा कामाप्रो ठेवणे"[१६] ही सूचना ग्रँट देतो. खजिन्यावर नजर ठेव हेही तो सांगतो. "कामकाजात भाऊबंद अथवा सका कोणी असला तर भीड धरणे नाही व पूरवी दस्तूर रयतेस उपद्रव देण्याचा आहे त्यास हाली इनसाफने वसूल घेणे तो व उपद्रव होणार नाही."[१७] ही ग्रँटची शिकवण प्रतापसिंहाने रयतेचे हित जपून व शक्यतो त्यांच्यावर कराचा बोजा न टाकून अमलात आणलेली दिसते. ग्रँट राजाला वैयक्तिक सल्लाही देतो की "बायेकूवर ममता किती आसली तरी मरजीप्रो जवाहिर द्यावे व पोषाख परुतु विश्वास धरून न वागावे व राजकारण काही न सांगावे व याप्रो सावधगिरी राज्यास ठेवावी राजाने."[१८]

राज्यकारभारामध्ये कोणत्या जागी कशी माणसे नेमावी हेही ग्रँट प्रतापसिंहास समजावून देतो. साताऱ्यामध्ये मामलेदार नेमणुकीसंबंधी ग्रँट राजाला सांगतो. "मामलेदार आसा आसावा की फरडा व साताऱ्यात कोणाची ममता नसावी व वरदी सर्वावर व माहाराजा माणसावर ही ठेवावी."[१९] दिवाणासंबंधी ग्रँट राजाला म्हणतो की "दिवाण सारे कामातून चांगला पाहिजे. महाराजास ही फिकीर आहे महाराजास ठेवावीच व दिवाण आसा ठेवावा की त्याचे मनात धनीपणा करावा आसा न ठेवावा व आसा मगदूरही देऊ नये. दिवाणास हे महाराजानी मनात हमेशा ठेवून वागावे."[२०] ग्रँट प्रत्येक माणूस कसा आहे व तू त्यांच्याशी कसे वाग हे राजाला सांगताना दिसतो. आबा पारसनीस व आन्याबा चीतळे दोघे हुशार आहेत. "परंतु आन्याबाचे हातून घात होणार नाही. पारसनीस या हातून घात होईल ही गोष्ट दिलात ठेवणे महाराजानी." हे तो राजाला बजावून सांगतो. ग्रँटने राजाला रयतेचा दस्तूर, किल्ले व फौज, 'न्याये वकील' यांच्याही दस्तुराची मार्गदर्शक तत्त्वे सांगितली व या तत्त्वांच्या आधारानेच ग्रँटने सातारा सोडल्यानंतर प्रतापसिंहाने राज्यकारभार चालवला. जमाबंदीची माहिती राजाला व्हावी, वसूल कसा करावा हे राजाला समजावे म्हणून सातारा राज्यातील १४ पेटे पाहणीस ग्रँट प्रतापसिंहाबरोबर हजर होता.

एका शेतकऱ्याची फिर्याद आली की 'तगाई दिली तर सेत चालेल नाहीतर पडेते व तगाईस जामीन मिलत नाही कसे' तेव्हा "तगाईविसी बंदोबस्त करून लेहून ठेवीत जाणे सेत पडू न देणे" हा हुकूम मामलेदारास ग्रँट करतो.[२१]

एखादे वेळेस वसुलात सूट मिळविण्यासाठी गावकरी मुद्दाम गाव जाळीत. परंतु त्यांना सूट मिळत नसे.[२२]

पाटलाकडून एखादे वेळेस पटी ज्यासती केली गेली तर ती रयतेस परत

दिली जाई.[२३]

एखाद्या गावी चोरी झाली व गावकरी फिर्याद घेऊन आले आणि तिचा माग जर लागत नसेल तर पाटलाला नुकसानभरपाई द्यावी लागत असे. पाटील ती गावातील रामोशी यांजकडून भरून घेत असे. म्हणजे पाटलाची रामोशावर जरबही राही व चोरीचा मागही लवकर लागण्यास मदत होई. जेव्हा दरोडे, चोऱ्या होत असत व रामोशी त्या भरून देत नसत व " मुदे लाऊन देत नाही व मागही लाऊन देते " तेव्हा थोडे दिवस त्यांना कैदेत टाकले जाई. रामोशी चोरी शोधून देऊ म्हणून जामीन देत तेव्हाच त्यांची सुटका होत असे.[२४] चोर, बेरड धरून दिले तर इनामही त्यांना दिले जाई. " मसूर पेठ्याचे नायेकास बेरडाचे इनाम रुपये १० दिले व गावगावचे रामोशी ज्याचे गावी चोरी जाहाली नाही त्यास दोन रुपयेप्रो. आवार इनाम दिला."[२५]

जो मामलेदार कामात चोख आहे, ज्याचे जमाबंदीचे काम आटोपले आहे, फिर्यादी नाहीत व लष्कराच्या दाणावैरणाची व्यवस्था ठीक आहे अशा मामलेदारास पगारवाढ दिली जाई. येथील मामलेदार वाळवे पेठ्याचे काम चांगले राखले याप्रो. आपले ही वसी बोलणे ग्राहास सांगणे जाहाले होते की मामलेदार चांगला त्याजवरून मामलेदारास तयेनात पहील दिडसे होती १५० ती हाली वीस जाजती केली. एकूण १७०[२६] कुणबी जेव्हा गावची वस्ती करण्यासाठी परवानगी मागीत, तेव्हा ' गावची पेरणीची सेते कमी न होता वस्ती होऊन आबादी होत असली तर करावी ' असे सरकारातून सांगितले जाई.[२७]

सातारा शहरामध्ये दारू गाळायला बंदी होती. सातारा शहर सुधारणेविषयी जे उपक्रम ग्रँटने घालून दिले तेच प्रतापसिंहाने पुढे चालविले. साताऱ्यामध्ये मुबलक पाणीपुरवठा व्हावा म्हणून अनेक सुधारणा करण्यात आल्या. यासंबंधी ' तदनंतर श्रीयेवतेश्वरास स्वारी जाऊन तेथील नळ पाहीला ' अशी नोंद रोजनिशीमध्ये आढळते. साताऱ्यामध्ये पक्के रस्ते बांधल्याचे उल्लेख रोजनिशीमध्ये येतात.

नाच, कलावंतिणीचे गाणे, तमाशा या त्या काळातील दरबारप्रथा आपल्याला सातारा राज्यातही दिसतात. कलावंतिणींना ठरावीक तैनात दरमहा सरकारकडून मिळत असे.

न्यायदान ही प्रशासनाची महत्त्वाची बाजू होय. रोजनिशीमध्ये न्यायव्यवस्था, निरनिराळ्या प्रकारच्या फिर्यादी यासंबंधी बरेच उल्लेख येतात.

प्रतापसिंहाकडे जे हक्क क्रमशः द्यावयाचे त्यामध्ये न्यायखात्यास अग्रक्रम देण्यात आला होता. राजाने न्यायव्यवस्थेमध्ये विशेष लक्ष घालावे असे ग्रँटला वाटत होते. " ग्रँट आले. ते बोलिले की महाराजांनी आगोधर पंचाइत पाहून वाकब व्हावे तावत्काळ मी वसुलीकाम पाहातो."[२८] प्रतापसिंह स्वतः न्यायालयात सामान्यतः रोज हजर असे. प्रतापसिंहाला न्यायदानाच्या कामात मदत करण्यासाठी सुरुवातीला बार्नेट, लिटिल,

अॅडम्स इ. इंग्रज अधिकारी होते पण निर्णयामध्ये ते हस्तक्षेप करीत नसत. आन्याबा चितळे हा अदालत कारकून होता आणि इतर अदालत कामासाठी निळकंठशास्त्री अभ्यंकर, आबा पारसनीस, बापू सुभेदार इ. मंडळी होती. शास्त्रार्थासंबंधी काही आधार लागे तेव्हा त्यांचे सल्ले घेतले जात असत. प्रतापसिंहाकडे प्रथम दिवाणी न्यायव्यवस्था सोपविण्यात आली व यामध्ये प्रतापसिंह निष्णात होत आहे असे दिसल्यावर ग्रँट व इतर इंग्रज अधिकारी यांनी आपला सहभाग कमी करण्यास सुरुवात केली. ग्रँट राजाला म्हणतो की, "आता महाराजांनी पंचायतेची उत्तरे द्यावीत बारनेट उगेच बसतील." दिवाणी न्यायव्यवस्थेनंतर फौजदारी न्यायव्यवस्था व अधिकार प्रतापसिंहाकडे सोपविण्यात आले, त्यांपैकी फाशी देण्याचा अधिकार हा एक होता.

ग्रँट राजाला न्यायदानासंबंधी काही सूचना देताना आढळतो. "कोणी फिर्याद केली तरी लागलीच जफ्ती करू नये. चौकसीने करावे." [२९] सर्वांची फिर्याद ऐकावी हे ग्रँट राजाला सांगतो. "महाराज जातीने न्याये इनसाफ पाहातात हे लोकांस फार चांगले वाटते व यावर लोकांचा भरंवसा माहाराजांवर होईल" [३०] हे ग्रँट राजाला म्हणतो. न्यायदानात विलंब टाळण्यासाठी "ज्याजकडे पंचायेती देऊन वरपाचेवर जाहाले असतील त्या लवकर फैसला जाहाला करार करून होतील याप्रो. नाही (तर) सरकार आज्ञे होईल दुसरे पंचास करणे हुकूम होईल." [३१] अशी सरकारची सक्त ताकिद असे.

न्यायालयात येणाऱ्या फिर्यादी वेगवेगळ्या प्रकारच्या असत. यामधे चोरी, खून, मारामारीसंबंधीच्या फिर्यादी, इनाम जमिनी, इनाम गाव, वतन यासंबंधीच्या फिर्यादी. तगाई, कर्ज, गाव वहीवाट फिर्यादी. व्यभिचार, दत्तक-विधान, सुतकासंबंधीच्या फिर्यादी. गावच्या सरहद्दविषयक फिर्यादी यांचा समावेश होतो. या सर्व फिर्यादींमध्ये चोरीच्या फिर्यादींची संख्या सामान्यतः जास्त असे. त्याखालोखाल गावच्या सरहद्दीविषयक फिर्यादी असत.

फिर्यादींच्या निर्णयांचे वर्गीकरण केले तर त्यामध्ये पारंपरिकताच अधिक दिसते. खून, व्यभिचार, दत्तक विधान, सुतकाचे खटले यासंबंधीचे निर्णय साधारणपणे हिंदुधर्मशास्त्रानुसार व जातिधर्मानुसार घेतले जात. व्यभिचाराला आळा घालण्यासाठी "ब्राह्मण, मराठे, कुणबी, मुसलमान वगैरे लोक बोलावून त्याचे विचारे ठरेल त्याप्रो. बायकांचा जार कर्माचा हुकूम कायदा करावा" [३२] असे प्रतापसिंहाचे मत होते, तर हे प्रकरण त्या त्या जातीकडे सोपवावे असे ग्रँटचे मत होते. बहुतेक वेळा ही प्रकरणे त्या जातीच्या पंचायतीमध्येच सोडविली जात असत.

२९ सप्टेंबर १८१९ च्या तहाने सातारा राज्याच्या सीमा निश्चित करण्यात आल्या आणि या प्रदेशातील जहागीरदार म्हणजे पंतप्रतिनिधी, पंचसचिव, फलटणचे निंबाळकर, अक्कलकोटचे भोसले, जतचे डफळे यांनी छत्रपतींची सत्ता मानावी असे ठरविण्यात

आले. जहागीरदारांसंबंधी बरेच उल्लेख रोजनिशीमध्ये आहेत त्यावरून जहागीरदार व प्रतापसिंह यांच्या संबंधाची स्थूल रूपरेखा आपल्याला समजते. जहागीरदार हे प्रतापसिंहाचा हुकूम, सत्ता मान्य करण्यास नाखुष होते. कोणत्याच प्रकारचे सहकार्य छत्रपतीला त्यांच्याकडून मिळत नसे. कार्यप्रयोजन, स्वारीसाठी आणि दसऱ्यासाठी त्यांनी साताऱ्याला यावे हे प्रतापसिंहाचे मत. परंतु दसरा समारंभासाठी हजर राहावे हे कलम तहात नाही म्हणून सचिव त्या समारंभासाठी गैरहजर राहतात. म्हणून बावडी गाव जप्त केल्याचा उल्लेख रोजनिशीत आहे. अक्कलकोटकरांचे गावही याच कारणासाठी जप्त केल्याचा उल्लेख आहे. ग्रँट राजाला म्हणतो की, 'हाली मी आहे व म्हाराजाचे हावाली राज्य केले नाही तो हे जाहागीरदार म्हाराजाचे ऐकत नाहीत मग कसे '[३३] ग्रँटला जहागीरदारांची वर्तणूक माहीत असल्यामुळे की काय 'जाहागीर दारावीसी फार महाराजास इजा होईल '[३४] हे अत्यंत सूचक उद्‌गार तो काढतो.

ग्रँट व प्रतापसिंह सहवासाने एकमेकांचे मित्र बनले. १८१८ ते १८२२ या छोट्या कालावधीत प्रतापसिंह व साताराच्या जीवनाशी ग्रँट समरस झाला होता. दोघांची मैत्री एकमेकांवरील विश्वासावर आधारलेली होती. कनिष्ठ बंधूस आत्मीय भावनेने वागवावे तशी चाल कॅ. ग्रँटने प्रतापसिंहाशी ठेविली...घोड्यावरून प्रवास करणे, जंगलात शिकार करणे, प्रांतात फिरून रयतेची पाहणी करणे इ. गोष्टींची आवड प्रतापसिंहास ग्रँटच्या सहवासाने उत्पन्न झाली.[३५] ग्रँटबद्दल प्रतापसिंहाच्या मनात नितान्त आदर होता. तो म्हणतो, 'जे समई कपीणी सरकारातून राज्य दिल्हे ते वेळेस जर आम्हास दिले असते तर संभाळण्यास मुसकल पडती. हाली ग्रांट साहेब यास कपीणी सरकारनी ठेऊन काही वाकब जाल्यामुळे आमचा फायदा आहे असेच पुढे करणे हे तुम्हाकडे आहे.'[३६] प्रतापसिंह व ग्रँट यांच्यामध्ये अत्यंत मनमोकळी बोलणी होत असत. त्या-मधूनच आपल्याला त्या दोघांमधील स्नेहाची कल्पना येते. त्यांच्या या अकृत्रिम स्नेहसंबंधाने प्रा. अ. रा. कुलकर्णी यांनी 'ऋणानुबंध' असे अत्यंत समर्पक वर्णन केले आहे.[३७] एके ठिकाणी ग्रँट प्रतापसिंहास म्हणतो की, "आम्ही येका गोष्टीवर खुसी आहो की आमी कसे बोलो तरी राग येत नाही" यावर राजा म्हणतो की "तुम्ही जे बोलता ते आमचे चांगल्याचे बोलता पर एखादे बोलता ते वेळे राग येतो परंतु असे वाटते की हे ग्राटाकडे नाही. कपीणी सरकारचे दस्तुर चालीचे मुळे बोलतात."[३८] तुळजापूर स्वारीच्या वेळी ग्रँट खूप अजारी पडला तेव्हा प्रतापसिंहाची मनःस्थिती विठ्ठलपंत ग्रँटला सांगतो की महाराजांनी आपलेसाठी देवास नवस केले "...व महाराज जेवले नाहीत आपले जरा उतार पडे तोपर्यंत चैन नव्हती."[३९] ग्रँटचे राजाला एकच सांगणे होते की 'वरचेवर मला पत्रे पाठवावीत महाराजांनी' आणि हा नियम दोघांनी मनापासून पाळला. ग्रँट व प्रतापसिंह यांच्यामधील पत्रव्यवहार १८३३ पर्यंतचा उपलब्ध असून त्यातून त्या दोघांमधील ऋणानुबंधाची कल्पना येते.

हळूहळू ग्रँटचा दस्तुर, त्याची राज्यकारभारासंबंधीची शिकवण प्रतापसिंहाने समजून घेतली. न्यायव्यवस्थेमध्ये प्रतापसिंह वाकबगार झाल्यानंतर महसूल व्यवस्था व त्यानंतर पोलिसखाते क्रमशः प्रतापसिंहाच्या हवाली करण्यात येणार होते. फक्त खजिना आणि शिबंदी यासंबंधीचा निर्णय घ्यावयाचा होता. छत्रपतींच्या हाती सत्ता क्रमाक्रमाने द्यावयाची की एकदम यासंबंधी निरनिराळ्या इंग्रज अधिकाऱ्यांच्या मतांची चर्चा रोजनिशीमध्ये सापडते. ' आलिपिष्टणाचे म्ह (ण) णे की राज माहाराज जसे काम करणार होतील त्याप्रो. हावाली करावे म्हाराजाचे मडुर साहेबाचे म्हणे की तीन चार वर्षाने सारा बंदोबस्त जाहाला म्हणजे हावाली माहाराजांनी करावे " [४०] यावर प्रतापसिंह म्हणतो की, " आलिपिष्टपणाचे म्हणे ठिक आहे व राज्यासाठी केवळ दोस्ती केली कपीणी सरकारची आसे नाही त्यापेक्षा जेणेकडून दोस्ती राहून कपीणी सरकारने सरदारचे विचारे व आमाबीसी जसी खातर होईल कामाचा आटोप त्याप्रो. करावे. " [४१]

सत्तान्तर कसे आणि केव्हा करावे या बाबतीत मतभेद असले तरी सत्तान्तर वादातीत होते. " चैत्रमासी राज्य हवाली करणे तो दिवस शुक्रवार शक १७४७-५ इंग्रजी महिना येप्रेल चैत्र शुद्ध चतुरदशी " हा दिवस सत्तान्तरासाठी मुक्रर करण्यात आला. [४२]

सत्तान्तरानंतर राजाने कसे वागावे हे ग्रँट राजाला बजावून सांगताना आढळतो. ग्रँट राजाला सांगतो की, " हालके माणसाचे काही ऐकू नये थोर माणसाची सला ऐकणे " यावर प्रतापसिंह म्हणतो की, " लाहान थोराची ऐकली तरी जो तुम्ही दस्तुर करून दिला आहे व या खेरज येकादे काम करणे ते कपीणी सरकारचे वकिलाचे विचारे करू आमी दुसरे जाणीत नाही. " [४३] ग्रँट राजाला सतत सांगतो की माझ्या नंतर जो रेसिडेंट येईल त्याच्याशी मैत्री ठेव, सलोख्याने वाग, त्याच्या सल्ल्याशिवाय कोणतीही गोष्ट करू नकोस. " हुशारीने राहावे व तहनाम्यावर हरघडी नजर ठेवून चालावे. " ही सूचना ग्रँट राजाला देतो. " नाहीतर येथे वकील राहील तो तहनाम्याचे कलम माहाराजास अडवून धरील साा येखादे मोठे कामाची अडचण व सला ही पुसत जावी." जाहागिरदारांविषयी ग्रँट सांगतो, " जाहागिरदाराविसी फार माहाराजास इजा होईल त्याचे बोभाट मुंबईस जातील तेव्हा तेथील वकिलात लिहितील की या प्रकरणी असा मजकूर ऐकिला आहे त्यावरून येथील वकील माहाराजास जबाब पुसतील तेव्हा माहाराजाकडून जबाब साफ व्हावा म्हणजे ठिक चालेल त्यात काही मतलब दिसला तरी अंदेशा दिलात ठेवीतील येविसी माहाराजास फार नजर ठेवावी लागेल. सर्व कामापेक्षा ज्यानती " [४४] ग्रँट राजाला सांगतो " म्हाराजांनी आपले मुलकाचे बाहीर फार जाऊ नये...आपली बाहीर लोकात किर्त जावी की रयेत व बंदोबस्त नीट ठेवणे. लोकांनी हुकुम मानावा आसे लौकिका व्हावे. " [४५]

राज्य हवाली करण्याचे काम एका जाहीरनाम्याने करावयाचे होते. कंपनी सरकारच्या जाहीरनाम्यात कोणत्या बाबींचा अंतर्भाव करावा यासंबंधी चर्चा साताऱ्यामध्ये सुरू झाली. जहागिरदार व राजा यांच्यातील संबंधाविषयी चॅपलिनला जो मसुदा पाठविला त्यामधे प्रतापसिंहाने सुचविले होते...."जाहागिरदार लहान मोठे वगैरे लोक त्याजकडून हुकुमात तकरार पडल्यास येविसीचा बंदोबस्त करण्याकरिता माहाराज सरकार कंपनी सरकारात इतला घेऊन माहाराज बंदोबस्त करीतील हे सर्व लोकांनी समजोन माहाराज सरकारचे हुकुमाप्रमाणे वागावे."[४६] चॅपलिनला हा मसुदा मिळाल्यानंतर त्याने तो दुरुस्त करून पाठविला व सुचविले की "जाहागिरदारी मोठे गोष्टीबदल यादी खेरीज तकरार पडली तरी जो कंपीणी सरकारातून हुकुम होईल त्याप्रमाणे म्हाराज करतील त्यास हुकूम आसू नये दुसरी आक्षरे घालावीत"[४७] या जाहिरनाम्यासंबंधी ग्रँटशी जी बोलणी प्रतापसिंहाने केली ते सविस्तरपणे रोजनिशीत नोंदविलेले सापडते.

सत्तान्तर समारंभाचा प्रमुख पाहुणा म्हणून चॅपलिनला बोलविण्यात आले होते. ५ एप्रिल १८२२ रोजी दरबार भरवून शिक्कामोर्तब प्रतापसिंहाच्या हवाली करण्यात आले. राजाशी एकान्तात बोलून चॅपलिनने कंपनी व राजा यांचे संबंध कसे राहतील हे राजाला सांगितले. सत्तांतराच्या या समारंभाचे विस्तृत वर्णन रोजनिशीमधे नोंदविलेले आहे. निरनिराळ्या मेजवान्या, त्याप्रसंगी भेट दिलेल्या वस्तू, पोषाख, मुत्सद्दी, मानकरी, दरखदार यांना देण्यात आलेली वस्त्रे त्यांच्या याद्या याचे तपशीलवार वर्णन रोजनिशीमधे आहे. राज्य हवाली केल्यानंतर ग्रँट साताऱ्याचा पोलिटिकल एजंट राहिला नाही. त्याचा हुद्दा रेसिडेंट असा करण्यात आला.

या रोजनिशीमधून प्रतापसिंहाच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल माहिती मिळतेच परंतु त्याबरोबर त्याच्या समकालीन व्यक्ती बाळाजीपंत नातू, दिवाण विठ्ठलपंत महाजनी, प्रतापसिंहाची आई माईसाहेब, बाल्याबा भोसले, भाऊ आप्पासाहेब व भाऊसाहेब यांचेही बरेच उल्लेख रोजनिशीमधे येतात.

साताऱ्याच्या नवीन राज्याची घडी नीट बसविण्यासाठी ग्रँटला अनुभवी माणसाची आवश्यकता होती. एल्फिन्स्टननेच बहुधा बाळाजीपंत नातूंची शिफारस केली असावी. ४ मार्च १८१८ रोजी राजाला भेटण्यासाठी एल्फिन्स्टनबरोबर बाळाजीपंत नातूही हजर होता. साताऱ्यामधे ग्रँटचा मदतनीस व चीफ नेटिव्ह एजंट म्हणून नेमणूक झाल्यानंतर इंग्रजांचे धोरण राजाला समजावून सांगणे व काही वेळा राजाची समजूत काढून ती धोरणे त्याला मान्य करावयास लावणे हे महत्त्वाचे काम बाळाजीपंतांकडे होते. बाळाजीकडे हर प्रकारची जबाबदारीची कामे ग्रँट सोपवीत असे. सुरुवातीच्या काळात प्रतापसिंह व ग्रँट यांच्या मधील तो एक दुवा होता. रोजनिशी क्रमांक एकमधे बाळाजीपंत नातूचे वारंवार उल्लेख येतात. "नंतर बाळाजीपंत

नातू ग्रँट येऊन नाना प्रकारची बोलणी प्रकर्ष चांगले चालीचे बोलले." [४८] २९ सप्टेंबर १८१९ च्या तहप्रकरणी बोलण्यात बाळाजीपंत नातूने महत्त्वाची भूमिका बजाविली असावी असे रोजनिशीमधील नोंदीवरून वाटते. "बाळाजीपंत येऊन तह प्रकरणी बोलणी बोलोन बोलिले की इंग्रजांनी तह ठरविला आहे त्यास रुकार द्यावा. नंतर ग्रँट व बाळाजीपंत येऊन बोलले." [४९] परंतु ग्रँटचा नातूवर पूर्ण विश्वास नसावा असे वाटते, कारण "तहाची प्रकर्णी बोलणी होणे त्या वेळेस बाळाजीपंतास ग्रँट बोलिले की तुम्ही बाहेर जावे" राज्य हावाली करण्याच्या थोडे दिवस आधी नातूसंबंधी रोजनिशीमध्ये उल्लेख येतो व तो भविष्यकाळाच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. ग्रँट राजाला सांगतो की "बाळाजीपंत नातूसी दोस्ती ठेवावी म्हणजे मी नाही किंवा आलिपिष्ठण नाही तरी उपयोगी पडेल म्हाराजास जवळ नाहीत हे ठिक आहे दुरनेच दोस्ती ठेवावी." [५०] बाळाजीपंत नातूने एका प्रकरणात लाच खाल्ली आहे असे ग्रँटला कळताच नातूला कामावरून कमी करण्यात आले. "बाळाजीपंत लाच घेतो असे आपणास ग्रँट साहेबाने सांगितले आहे." हे प्रतापसिंहाने अनेक प्रतिष्ठित लोकांना सांगितले आहे असे नातूंचे म्हणणे होते. व त्यासंबंधी ग्रँट विठ्ठलपंत दिवाण आणि प्रतापसिंह यांना विचारतो. रोजनिशीमध्ये यासंबंधी नोंद आढळते की, "तुम्हापाशी म्हाराज बाळाजीपंत दरबार खर्च खातात असे बोलले की काये विठोबा बोलिले की मजपाशी हे काही बोलले नाहीत." शेवटी बाळाजीपंत काशीस जाण्याचे ठरवितो. बाळाजीपंताला प्रतापसिंह, माईसाहेब, ग्रँट यांनी मेजवानी दिल्याचे उल्लेख रोजनिशीमधे आहेत. यानंतर बाळाजीपंत नातूचे उल्लेख रोजनिशीमधे येत नाहीत. एक मात्र, राज्य हवाली करण्याच्या समारंभाला नातूला बोलविण्यात येते याचा उल्लेख रोजनिशीमधे येतो.

प्रतापसिंहाचा सर्वांत जास्त विश्वास विठ्ठलपंत महाजनीवर असल्यामुळे दिवाण म्हणून त्याची नियुक्ती करण्यात आली होती. ग्रँटचादेखील विठ्ठलपंत दिवाणावर भरोसा होता. "जीवापासून चांगले करावे महाराजांचे आसे विठोबा सीवाये (नाही) परंतु आशक्त व मेहनत होणार नाही" असे ग्रँटचे मत होते.

बाल्याबा भोसलेसंबंधी रोजनिशीमधे कमी उल्लेख येतात. 'बाल्याबा भोसले लहाण आहेत परंतु हुशार व महाराजाचे हितास चांगले' असे ग्रँट म्हणतो.

प्रतापसिंहाची आई माईसाहेब ही महत्त्वाकांक्षी, करारी व स्वभावाने रागीट असावी असे रोजनिशीमधील नोंदीवरून वाटते. प्रतापसिंहाला आई, माईसाहेबाबद्दल आदर होता. दिवसांतून एकदातरी प्रतापसिंह माईसाहेबांच्या समाचाराला गेल्याचे उल्लेख रोजनिशी क्रमांक १ मध्ये आहेत. २ जानेवारी १८२२ रोजी माईसाहेब मृत्यू पावली अशी नोंद रोजनिशीमधे आहे.

प्रतापसिंहाचा भाऊ आप्पासाहेब हा सद्वर्तनी नसावा असे वाटते. रोजनिशीमधील

नोंदी त्याच्याविषयी चांगले सांगणाऱ्या नाहीत. ग्रँटचे आप्पासाहेबाबद्दल मत फारसे चांगले नव्हते. "आपासाहेब गैर राहा चालतात हे माईस कळवावे" हे तो विठोबास सांगतो.

१८१८ ते १८२२ या कालखंडात ग्रँटचे व्यक्तिमत्त्व हे जास्त ठळकपणे आढळते. त्या मानाने प्रतापसिंहाचे व्यक्तिमत्त्व हे जास्त स्पष्ट उभे राहात नाही. मात्र काही स्वभाव विशेष जाणवतात.

प्रतापसिंह वृत्तीने धार्मिक व श्रद्धाळू होता. हिंदुधर्मानुसार येणारे वर्षातील सर्व सण तो मनःपूर्वकतेने साजरे करतो. ग्रहणस्नान, ब्राह्मणभोजन, श्राद्धपक्ष इ. गोष्टी तो श्रद्धेने करताना दिसतो. यासंबंधी अनेक नोंदी रोजनिशीमध्ये आहेत. दसऱ्याचे तपशीलवार वर्णनही रोजनिशीमधे आढळते. दसऱ्याचे पोषाख तो आठवणीने एल्‌फिन्स्टन, ज. स्मित चॅपलिन यांना पाठवे. संक्रांतीचा तीळगूळही तो त्यांना पाठवायला विसरत नसे.

प्रतापसिंह मनाने सरळ, उदार व वृत्तीने सहिष्णू होता. प्रतापसिंहाचे ग्रँट किंवा इतर इंग्रज अधिकारी यांच्याशी झालेल्या चर्चावरून तो अत्यंत स्पष्ट बोलणारा वाटतो.

प्रतापसिंहाच्या कौटुंबिक आयुष्याचे उल्लेख रोजनिशीमधे फारसे नाहीतच. प्रतापसिंहाची प्रथम पत्नी १८२१ मधे मृत्यू पावल्यानंतर १५ दिवसांनी प्रतापसिंहाने दुसरे लग्न केल्याची नोंद रोजनिशीमध्ये आहे.

सातारा राज्य स्थापनेपासून ते इंग्रजांनी १८४८ मध्ये ते खालसा करीपर्यंत त्या काळातील सामाजिक, राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक घटनांसंबंधीचे अस्सल चित्र प्रतापसिंहाच्या रोजनिशीमधून आपल्याला आढळते. त्यामुळे सातारा राज्याच्या इतिहासाच्या दृष्टीने ते अत्यंत महत्त्वाचे साधन ठरते. म्हणून या लेखाद्वारे या रोजनिश्यांकडे मी आपले लक्ष वेधू इच्छिते.

संदर्भ :

१	रो. क्र.	४	पृ. क्र.	१४०	१४-३-१८२१
२	पेशवे दफ्तरातील निवडक कागदपत्र, भाग ४२, पृ. १, मराठी रियासत उ. वि. भाग ३, पृ. ५९३.				
३	रो. क्र.	१	पृ. क्र.	१०२	१२-१०-१८१८
४	रो. क्र.	१	पृ. क्र.	१०३	१५-७-१८१९
५	रो. क्र.	१	पृ. क्र.	६८	१५-४-१८१९ १६-४-१८१९
६	रो. क्र.	४	पृ. क्र.	११७	१९-२-१८२१

७	रो. क्र.	२	पृ. क्र.	९४	१४–३–१८२०
८	रो. क्र.	५	पृ. क्र.	११३	१७–२–१८२२
९	रो. क्र.	४	पृ. क्र.	१००	२९–१–१८२१
१०	रो. क्र.	४	पृ. क्र.	२६३	१७–६–१८२१
११	रो. क्र.	३	पृ. क्र.	६०	२२–६–१८२०
१२	रो. क्र.	१	पृ. क्र.	७६	१६–५–१८१९
१३	रो. क्र.	१	पृ. क्र.	५	२४–१०–१८१८
१४	रो. क्र.	१	पृ. क्र.	१५०	१८–१०–१८१९
१५	रो. क्र.	४	पृ. क्र.	७	१८–१०–१८२०
१६	रो. क्र.	३	पृ. क्र.	८०	१७–७–१८२०
१७	रो. क्र.	४	पृ. क्र.	४३	३०–११–१८२०
१८	रो. क्र.	३	पृ. क्र.	२६	२३–५–१८२०
१९	रो. क्र.	३	पृ. क्र.	१५७	२५–९–१८२०
२०	रो. क्र.	४	पृ. क्र.	३५२–५३	१४–८–१८२१
२१	रो. क्र.	३	पृ. क्र.	२२	१९–५–१८२०
२२	रो. क्र.	४	पृ. क्र.	१२८	२–३–१८२१
२३	रो. क्र.	३	पृ. क्र.	१४५	१२–९–१८२०
२४	रो. क्र.	४	पृ. क्र.	५५	१२–१२–१८३०
२५	रो. क्र.	४	पृ. क्र.	६१	१८–१२–१८२०
२६	रो. क्र.	४	पृ. क्र.	७८, ७९	३–१–१८२१
२७	रो. क्र.	४	पृ. क्र.	३३९	८–८–१८२१
२८	रो. क्र.	१	पृ. क्र.	१४६	१५–१०––१८१९
२९	रो. क्र.	१	पृ. क्र.	९	३०–१०–१८१८
३०	रो. क्र.	३	पृ. क्र.	७०	३–७–१८२०
३१	रो. क्र.	४	पृ. क्र.	३४५	१०–८–१८२१
३२	रो. क्र.	४	पृ. क्र.	२१०–११	६–१–१८२१
३३	रो. क्र.	५	पृ. क्र.	६२	१४–१२–१८२१
३४	रो. क्र.	४	पृ. क्र.	२८३	३–७–१८२१
३५	सरदेसाई गो. स. मराठी रियासत उ. वि. भाग ३, पृ. क्र. ५९३				
३६	रो. क्र.	४	पृ. क्र.	४३	३०–११–१८२०
३७	कुलकर्णी अ. रा., जेम्स कनिंगहॅम ग्रँट डफ, पृ. क्र. २४				
३८	रो. क्र.	५	पृ. क्र.	१११	१७–१२–१८२२
३९	रो. क्र.	५	पृ. क्र.	६१	१३–१२–१८२१

४०	रो. क्र.	३	पृ. क्र.	१९	१८–५–१८२०
४१	Ibid,	३	पृ. क्र.	१९	
४२	रो. क्र.	५	पृ. क्र.	९१	२१–१–१८२२
४३	रो. क्र.	५	पृ. क्र.	१११	१७–२–१८२२
४४	रो. क्र.	४	पृ. क्र.	२८३	३–७–१८२१
४५	रो. क्र.	४	पृ. क्र.	३१२	२२–७–१८२१
४६	रो. क्र.	५	पृ. क्र.	१४९	१९–३–१८२२
४७	रो. क्र.	५	पृ. क्र.	१६१	२७–३–१८२२
४८	रो. क्र.	१	पृ. क्र.	६३	२७–३–१८१९
४९	रो. क्र.	१	पृ. क्र.	१३८	२४–९–१८१९
५०	रो. क्र.	५	पृ. क्र.	१२९	१०–३–१८२२

Agrarian Conditions in Maharashtra, 1740–1790

(A study of Prants of Poona–Junnar, Satara, Wai, Mawal and Konkan territories of the Maratha Country)

Dr. T. T. Mahajan

The attempt to study the agrarian conditions of Maharashtra in the 18th Century at the regional level seems to be neglected by the scholars of Maratha history. Fortunately, available contemporary records enable us to study the agrarian conditions of the region comprising prants like Poona-Junnar, Satara, Wai, Mawal and Konkan territories during the period 1740-1790. The object of this paper is to describe the general conditions of the peasantry in the Maratha Country with the help of the analysis of the basic notable factors such as the state revenue demand, the crop-rates, rate of rent or demand of feudatories, usury capital of moneylender, average returns from cultivation, productivity of land, cost of production, prices of agricultural commodities etc.

Class Composition of Agricultural Population In Medieval Maharashtra.

Unfortunately, we have no data about the agricultural population of the Maratha country in the 18th century and hence the percentage of agricultural population cannot be stated accurately. The agricultural population of medieval Maharashtra can be roughly divided into the following categories :—

(1) Mirasdars or landholders (Thalkaries) or peasant proprietor or landowners.

(2) Mokasi people, i. e. holders of a rentfree lands from Government.

(3) Uparis – who cultivated the lands of others on rent can be called as land tenures.[1]

(4) Non-cultivating landlords or feudatories.

(5) Moneylenders.

(6) Landless labourers, etc

Types of Tenants :

The peasants over-burdened with debt[2] mortgaged their lands and cultivated the lands of others on fixed rent. Sometimes, the cultivators who could not pay revenue or earn their subsistence had to borrow loan and mortgage the lands in lieu of exhorbitant rate of interest[3]. Thus the peasants with no lands or mortgaged their lands for debt could work either as an agricultural labourer or cultivated lands of others on rent. They worked on the lands of Jagirdars or Mirasdars by paying fixed produce rent or fixed cash[4]. In Batai system, the peasants cultivated the lands of Government on fixed rent either in cash or in kind. The government, out of the total produce deducted some portion of grains for seeds and also for other necessary charges and left 1/2 or 1/3 of the crop produce to the peasants and remaining output was taken by government[5] itself.

Another class of tenants who were known as uparis held government land under the management of Mamlatdars,[6] and rent collected from them was very high. For example the rent charged on the tenants who cultivated lands in pargana Deher Gorath and Korkada in prant Kalyan was fifty rupees for certain bighas of land. But the rent was so high that the tenants left that pargana and went into talukas of Trimbak and Ratangad where they could obtain as many bighas of land as they cultivated in previous pargana for twenty-five·rupees.

In such cases, it is found that the rent charged was two times higher than the usual rates. In other areas, usually the rent was as high as one and half or two times the land revenue demand i. e. 1/3 of total produce. Other tenants who cultivated that land of others on rent were known as Kunbis. The rent taken from the Kunbis was mostly in form of share cropping. For example, a Kunbi rented a field from Vithal Bhat Tamhankar in tarf Kharepatan in Prant Rajapur on the fifty percentage of the

produce[7] which was a high rate of rent and also indicates the exploitation of peasants by the landowner.

Impact of the moneylender's hold on peasantry :

In Maharashtra of the 18th century the moneylending business was quite wide spread. In cities, like Poona and others, the number of bankers was quite large. The records reveal that in all Prants of Maratha empire indebtedness of the people was quite considerable.[8] The transaction in the day-book account of Tulshibaghwale and other bankers, shows that in most of cases, the lands were mortgaged against debt[9] and many of the debtors totally lost their lands to their creditors.[10] Thus, for example, a cultivator in Dhalewadi in tarf Karhepathar of Poona prant due to the heavy debt, sold his seven bighas of irrigated lands together with well and trees at very low rate to the creditor[11]. The impact of the hold of moneylender of the producer was worthy to note. The moneylender usurped the surplus produce from the agriculture. The cultivator was forced to sale his produce to the banker at much below the market price. The moneylender gave advances to the peasants at the time of their revenue, fell due on condition that they cultivated a particular crop (rice) and supplied it to the former at a fixed rate which was usually very low.

For example, a cultivator, Dhuloji Jagannath Siwane was thus forced by the creditor to agree to pay to the latter, one seer of rice more in addition to the market price of rice for a rupee.[12] Sometimes, the creditor used to advance the loan to the producer on condition that he should sell that produce to the creditor at the fixed rate as mentioned in loan bond or Karjakhat. But if the price rate of that commodity came down, the latter had to sell it to the former at the decreased rate, on the contrary, it was to be sold at fixed rate when its price increased.[13] These evidences are enough to show that how the bankers exercised influence over the prices of agricultural commodities. In addition to this, the moneylenders charged exhorbitant rate of interest varying from 18 to 48 percent.[14] In fact, through the system of advancement of loan to peasants, the creditor exercised his control over peasantry in form of mortgage of land

or extraction of a large surplus from producers. The moneylenders like Vaidyas to whom the Peshwa govt. granted inam villages, collected other cesses, in addition to revenue tax such as Gade patti (Cart tax) and Kharchpatti (Expense tax) for the peasants in their inam villages.[15] In this contest, it can be said that moneylenders' usury capital (in form of loan) provided to agriculture in Maharashtra, played the role a parasite and earned a huge profit by extracting a large share from agricultural produce.

Revenue demand of the State :

The lands in Maharashtra under the Peshwas' can be classified as under :

(1) Jirayat[16] (dry) (2) Bagayit[17] (Wet). Again irrigated lands were of two types : 1 Patsthal[18]—lands irrigated by Canal water, 2 Motsthal[19] - lands irrigated by well water. The lands were classified on the fertility also and were styled as- 1 Awwal (Superior) 2 Dum - ordinary 3 Sim - inferior.[20] Thus, the revenue assessment was made on the principle of the fertility of lands and kind of soil and mode of supply of water. We find no uniformity all over the Maratha empire in revenue system. In different prants of the Empire there were different rates of assessment and distinguished methods of assessment and diffe-rent land tenures.

Now, we may pass on the statistics of revenue rates on individual crops in prants of Wai and Junnar of the year 1740-41. The rate of revenue demand per bigha in these prants were as follows :[21]

Table I

Harvest	Crops and Area		Kind of Soil	In Rupees/Maunds/ Payalis per Bigha
Kharif	Rice	Tarf Haveli Pal (Junnar prant)	—	10 Maunds
	Sugar-cane		—	5/— Rupees

	Jwari	Mauje Kathapur (Wai Prant)	Superior	$3\frac{1}{4}$ Maunds –1 Payali
			Ordinary	$2\frac{1}{2}$,, –2 Payalis
			Inferior	$1\frac{3}{4}$,, –1 Payali
Rabi	Summer Crops			
	Wheat	Mauje Kathapur (Wai prant)	Superior	Rs. $1\frac{1}{2}$
	gram		Ordinary	Rs. $1\frac{1}{2}$
	Vegetables		Inferior	Rs. 2

An examination of the rate of revenue demand and amount collected per bigha in Prant of Junnar in terms of rupees shows that the revenue rates per bigha on the crops in prant of Wai were of slightly higher than that in Junnar prant. The variation of rates indicate the quality of land on which the state demand was fixed. The lower rate of demand indicated the inferior land and higher demand superior land. It appears from the above table I, that the rates of Kharif crops per bigha were much higher than those of rabi crops. And this can be substantiated with the following table II of revenue rates of the tarf Nane Mawal of the year 1747-48.[22]

Table II

Crops	Rates in payalis per Rupee	Area
Rabi Crops		
Wheat	3 Payalis	Tarf Nane Mawal
Gram	3 Payalis	,,
Kharif Crops		
Cereals	6 Payalis	Paun Mawal
Nachana	6 Payalis	,,
Rice	6 Payalis	,,
Wari	6 Payalis	,,

The rates of Cash crops per bigha were as shown in the table III.

Table III

Crops	Area	Rate in Rupees anna/per maund	Year
Sugar-cane	Tarf Haveli	5 Rupees[23]	1740-41.
Sugar-cane	Chandwad pargana	10 Rupees[24]	1749-05.
Sugar-cane	Neral Taluka.	5 Rupees[25]	1772-73.
Til	Nane Mawal	Rs. 2-8 annas-per maund[26]	1743-44.
Til	,,	Rs. 3-8 annas per maund[27]	1745-46
Jute	Neral	5 Rupees[28]	1772-73
Coconut trees & land	,,	8 Annas for every tree.	1772-73.
Pam trees land	,,	4 Annas for every tree	1772-73.

It will appear from the above table that different rates were applied for the same crop in different prants. Thus, the revenue rate on Sugar-cane in Chandwad Pargana was double than those of other prants. It was because the rates were fixed on the quality of soil or the type of land. In the following table IV, I have set out the details of rate for different crops per bigha of prant Nane Mawal of the years 1743-44[29] and 1745-46[30].

Table IV

Crops	Area	Rate in Rupees & Annas per maund in the year				Percentage of increase in revenue demand in 1745-46
		1743-44		1745-46		
		Rs.	Annas	Rs.	Annas	
Rice	Mawal	1 —	4	1 —	8	20%
Nagali	,,	1 —	8	1- —	12	20%
Jwari	,,	1 —	12	2 —	4	30%
Wheat	,,	2 —	00	3 —	00	50%
Til	,,	2 —	8	3 —	8	40%

It is clear from the above table of cash rates of revenue demand that the rates of revenue demand of the crops like Nagali, Jwari, Wheat and Til etc., were increased about 25% to 50% in the year of 1745-46, than the rates of 1743-44. The increase in revenue rates was probably due to the increase in area of cultivation.

Burden of land Revenue

The burden of land revenue as a portion of gross produce could be high as one-half in some of the cases. Or when the lands were assessed at the rate of ten rupees per bigha.[31] Sometimes, the peasants cultivating the government lands under batai system, were levied at the rate of two-third quantity of the total of produce.[32] This rate of assessment was certainly higher when one takes into consideration of the average value of product per bigha of wet and dry lands. The average value per bigha can roughly be estimated as under : The land revenue rate of wet land was 10 rupees per bigha.[33] The land producing rice was assessed at the rate of ten maunds of rice.[34] The land revenue share was generally 1/3 of grand produce.[35] The price of rice varied from 16 rupees to 20 rupees per khandi[36]. Hence market price of 1/3 revenue i. e. 10 mands of rice can be roughly estimated between Rs. 8 to 10.

Thus, the average value product per bigha of rice land can roughly be stated at between Rs. 24/— to Rs. 30/—. And the average value product per bigha of the irrigated land would be Rs. 30/—. Likewise average value product of one bigha of the land producing Wheat and Jwari could be roughly estimated at 6 to 10 maunds respectively i. e. at Rs. 12/— to 15/— of their market prices.[37] Again it can be asserted that due to the less fertility of natural soil in Maharashtra, the average yield of grains like rice, jwari per bigha could not be more than 8 to 10 maunds and 6 maunds of wheat. This also supports that the incidence of land revenue was heavy on the peasants and hardly met by them out of gross produce. That the land revenue was heavy which can be corroborated by the information relating to the complaints about the land revenue. The peasants in tarf Wasi of Taluka Pen made complaint against the revenue

TABLE V

Crop	Year	Area	Revenue Demand per bigha	Prices Rs. Anna	Percentage of increase in revenue demand per bigha	Area	Year & price per maund	Percentage of Increase in prices
Rice	1740-41	Kathapur Prant Wai	3 maunds[38]	1-00[39]	10 Maunds i.e. 300%	Tarf Haveli Pal	1740-41[40] Rs. Anna 1-4	25%
Jwari	1743-44	Mawal	Rs. Anna 1-12	1-12	Rs. Anna 2-4 i.e. 30%	Mawal	1745-46	30%
Wheat	1740-41	Kathapur	½ Maund[41]	3-00 per Maund	3 Maunds[42] & 13 seers per bigha i.e. 500%	Karje Satara	1792-10 Rs. per bigha	300%

demand as 10 maunds of rice per bigha which was exhorbitant assessment. Later on the Land Ravenue was reduced by the government to 8 maunds per bigha.[43]

Now we can form rough idea about the burden of revenue demand from the following comparative table of the region under review (i. e. Wai, Poona, Junnar Prants) showing the increase in revenue demand and agricultural prices during 1740–1790.

It is apparent from the table above that the Government demand of land revenue increased (300+600+30=930÷3=310) on an average about 310 percent from 1740 1792, whereas the food prices raised on an average (300+30+25=355÷3 =118) only by 118 percent. This indicates that the burden of land revenue was heavy on the peasants because as revenue rates increased the prices of agricultural commodities did not increase in proportionately.

As a result, many times the rayats had to borrow loan from the Banker in order to pay the revenue to Government. The over-burdened loans forced many of them to mortgage or sale their lands to the creditors or prepare them to give their lands to moneylenders for cultivation.[44] As a result, sometimes land had no value and no market as such. That is why as one of the records states, once 'three bighas' of land in Mauje Gorhe Budruk of tarf Karjat Mawal was sold for Rs. $4\frac{1}{2}$ i.e. at the rate of Rs. $1\frac{1}{2}$ per bigha only.[45]

Productivity of Land

Let us now think about the condition of the average peasant or tenant who cultivated the land of others on fixed produce rent. After deducting 1/3rd of total produce as land revenue and seed, the remaining 2/3rd was shared by landowner and the cultivator (each got 1/3rd of remained produce). Let us assume that a peasant's family was consisted of 8 members (assuming that 6, out of the 8 were adults). And the average consumption need of grain like Jwari per head was 1/2 seer per day and the children consumed half the adult's share. Then the total requirement of Jwari per year was about 32 maunds. The peasant's share from the total produce of Jwari per bigha

was 3 maunds. The area required therefore to produce the minimum amount of jwari or rice needed for the subsistence of the peasant family would be 12 bighas. Thus, from the above calculation it can be said that the tenant working on 12 bighas of land or a peasant owing as little as 4 bighas of land alone could be able to subsist on the produce, provided that the crops did not fail.

Other cesses imposed on peasants

In addition to the revenue tax, other additional taxes were also collected from peasants in the parganas or villages in Jagirs. Chapekar[46] N. G. has given a list of 24 taxes or pattyas imposed on the subjects by the Maratha Government. The details have been given below :

Talepatti : Cesses to be collected from peasants to meet the expenses for constructing the lake. The names of such other taxes indicate the purpose for which they were levied upon the subjects. For example, the Karjpatti, Nalpatti, Babhulpatti, Lagnapatti, Bailpatti, etc. These cesses were imposed on peasants for the work the money collected (in form of such taxes) was used.

Dahakpatti : 1/10th Tax was imposed on per bigha.[47]

Babhulpatti and Bailpatti : These cesses were imposed on the rayats of prant including saranjam to meet the expenses of artillery. Babhulwood or bullocks used for artillery were purchased with the help of this money. It was collected at the rate of 8 percent or at the rate of 8 Annas per hundred of the revenue to be made from the villages[48] Some other cesses were levied on different occasion. For example, tax was levied from Village people to meet the miscellaneous expenses incurred by the Peshwa in his journey,[49] or to meet the expenses of his thread ceremoney or marriage ceremony.[50]

Vanchari : A tax collected from sheepowner as a grazing fees.[51]

Inspection Tax : A tax imposed on rayats to meet the expenditure on account of diet money to officers making revenue

